नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## बिहार एक्झिट पोल : एनडीएची सरशी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :**
बिहार विधानसभा निवडणुकीसाठी एक्झिट पोलचे निकाल जाहीर होऊ लागले आहेत. सर्वेक्षणानुसार, एनडीएला दणदणीत विजय मिळण्याचा अंदाज आहे आणि नितीश कुमार सरकार पुन्हा स्थापन होऊ शकते.

बिहारमध्ये एकूण २४३ विधानसभा जागा असून, बहुमतासाठी १२२ जागा आवश्यक आहेत. सर्वेक्षण एजन्सी मॅट्रिजच्या अंदाजानुसार, एनडीएला ४८% मते मिळू शकतात, ज्यामुळे त्यांना १४७-१६७ जागा मिळण्याची शक्यता आहे. जेडीयू भाजपपेक्षा मोठा पक्ष म्हणून उदयास येऊ शकतो. मॅट्रिजने जेडीयूला ६७-७५ जागा मिळण्याचा अंदाज दिला आहे, तर भाजपलाही साधारण समान जागा मिळण्याची अपेक्षा आहे.

* वर्ष ५१ * अंक १२९ * | * अमरावती * | बुधवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● | किंमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) | * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

**खरीखरी..**

## नितीशची निवडणूक

अखेर आज बिहारचे मतदान पार पडले. सहा तारखेला झालेले मतदान साधारण ६० ते ६५ टक्के च्या दरम्यान होते असे म्हणतात. या वेळेचे दुसऱ्या टप्प्याचे मतदान त्यापेक्षाही जास्त आहे असेही सांगण्यात येत आहे. मात्र सहा तारखेला बरेच दिवस उलटून गेल्यानंतरही निवडणूक आयोगाने त्या सहा तारखेला झालेल्या मतदानाची आकडेवारी जाहीर केलेली नाही. जुन्या काळामध्ये संगणक नव्हते, मोबाईल नव्हता, इंटरनेट सुविधा नव्हती आणि साधे फोनही लवकर जोडण्यात येत नव्हते. त्या काळातील निवडणूक आयोग जास्तीत जास्त २४ तासांमध्ये मतदानाची आकडेवारी देत होते. आजचा निवडणूक आयोग इतका मठ्ठ कसा झाला आहे किंवा या निवडणूक आयोगाने मठ्ठपणाचे सोंग घेतले आहे हा खरोखर संशोधनाचा विषय आहे. केंद्रीय निवडणूक आयोग काय किंवा राज्याचा निवडणूक आयोग काय, दोन्ही निवडणूक आयुक्त फक्त पत्रकार परिषदा घेतात आणि त्यात पत्रकारांच्या प्रश्नांची उत्तरेच देत नाहीत. एकूणच ज्या पद्धतीने निवडणूक आयोगाचा कारभार सुरू आहे त्यामध्ये खरीखोटी का असेना थोडीतरी पारदर्शकता असलीच पाहिजे, असे सुबुद्ध जनतेला वाटले तर त्यात गैर काय आहे. बिहारच्या मतदानात गत निवडणुकीपेक्षा आठ ते दहा टक्के मतदान वाढले आहे. हे वाढलेले मतदान सहसा सत्ताधारी पक्षाला अनुकूल नसते असा अनुभव आहे यामुळे मतदानाची टक्केवारी वाढल्यावर आमचाच विजय होणार असे एनडीए आणि इंडिया या दोघांनाही वाटते. आताच्या मतदानानंतर जे जे एक्झिट पोल म्हणजेच विजयाचे अंदाज येत आहेत त्यातही बराच मोठा संभ्रम आहे. छाती ठोकपणे कोणीही अमुक एक आघाडी किंवा युती विजय होईल असे सांगत नाही. बिहारमध्ये निवडणुका सुरू आहेत आणि नितीश कुमार कुप भवनात बसलेले आहेत. काल चंद्राबाबू नायडूंचे पुत्र बिहारमध्ये आले होते कारण नितीश कुमार दुखावलेले आहेत असे म्हणतात. यापुढे नितीश कुमार यांना एनडीए मध्ये टिकवून ठेवायचे असेल तर त्यांच्या कलाकलाने चालावे लागेल. सध्याच्या काळातही नितीश कुमार यांच्याकडे स्वतःचे १२ ते १५ टक्के मतदार आहेत हे मतदार नितीश कुमार यांना मते देतीलच मात्र त्यांची मते भाजपाला मिळतील काय, हा खरा प्रश्न आहे. हीच धाकधूक असल्याने एनडीएतील अनेक महत्त्वाच्या पक्षांनी नितीश कुमार यांना भेटून त्यांची मनधरणी केल्याचे ऐकू येत आहे. हे सर्व खरे असले तरी पुढील तीन दिवसांमध्ये अजून काहीतरी उलटसुलट बातम्या येतीलच. यापूर्वीचा अनुभव लक्षात घेता महाराष्ट्र आणि हरियाणा यासारख्या राज्यांमध्ये सत्ताधारी पक्षाचा सुपडा साफ होणार असे दिसत असतानाही त्यांनी विरोधी पक्षांचा सुपडा साफ केला. आता सर्व मदार केवळ नितीश कुमार यांच्यावर अवलंबून आहे असे दिसते. आजकाल अनेक समीकरणे प्रत्यक्षात उतरत नाहीत मात्र बिहारमध्ये एनडीए जिंकलाच पाहिजे, या ताकदीने एनडीए निवडणुकीत उतरलेले होते असे म्हणतात. ही निवडणूक मोदी आणि शहा यांच्यासाठी तेवढीच महत्त्वाची आहे त्यामुळेच पुढील तीन दिवस सर्वच पक्ष आपापल्या विजयाच्या धुंदीत असतील यात शंकाच नाही. तरीही एनडीए आणि इंडिया या दोघांनाही केवळ नितीश कुमार हेच सहजसाध्य आहेत. यामुळेच आजही बिहार म्हणजे नितीश कुमार आणि नितीश कुमार म्हणजे बिहार हे समीकरण आता सत्ताधारी पक्षालाही मानावे लागेल. थोडक्यात सांगायचे झाले तर नितीश कुमार अजून संपलेले नाहीत, हे त्यांनी दाखवून दिलेले आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

**दिल्ली ब्लास्ट**

# तपास एनआयएकडे

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :**
सोमवारी संध्याकाळी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार स्फोटात हल्लेखोरही ठार झाला आहे. घटनेच्या २० तासांनंतर गृह मंत्रालयाने दिल्ली कार बॉम्बस्फोटाचा तपास एनआयएकडे सोपवला आहे. १० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६:५२ वाजता लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ हा कार बॉम्बस्फोट झाला.
या स्फोटातील मृतांची संख्या १२ झाली आहे. यामध्ये दोन महिलांचा समावेश आहे. २० जखमींवर उपचार सुरू आहेत. दोन मृतदेहांची ओळख पटली आहे. उर्वरित मृतदेहांची ओळख डीएनए चाचणीद्वारे पटवली जाईल. मंगळवारी स्फोटात वापरल्या गेलेल्या पांढऱ्या आय २० कारचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले. मेट्रो स्टेशन पार्किंगमधून बाहेर पडताना कारमध्ये काळा मास्क घातलेला एक माणूस दिसला.



धागेदोरे गवसले ▪ पुलवामाहून डॉ. उमरचा मित्र डॉ. सज्जादला अटक ▪ आई आणि भावांनंतर वडीलही ताब्यात

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कारमधील व्यक्तीची ओळख डॉ. मोहम्मद उमर नबी अशी झाली आहे, जो पुलवामा येथील रहिवासी आहे. उमरने स्फोटकांनी स्वतःला उडवून दिल्याचे पोलिस सूत्रांचे म्हणणे आहे. त्याच्या आई आणि दोन भावांना काश्मीर पोलिसांनी पुलवामा येथे डीएनए चाचणीसाठी ताब्यात घेतले आहे. त्याचा मित्र डॉक्टर सज्जाद आणि त्याचे वडील यांनाही पुलवामा येथे ताब्यात घेण्यात आले आहे.

वृत्तसंस्था पीटीआयने वृत्त दिले आहे की पोलिसांच्या प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की स्फोटात अमोनियम नायट्रेट, इंधन आणि डेटोनेटरचा वापर करण्यात आला होता.

दरम्यान, बॉम्बस्फोटाची चौकशी आता राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) करणार आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे. आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एक उच्चस्तरीय बैठक घेतली ज्यामध्ये एनआयएकडून स्फोटाची चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सूत्रांनी सांगितले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठकीत केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन, गुप्तचर विभागाचे (आयबी) संचालक तपन डेका, दिल्ली पोलिस आयुक्त सतीश गोलचा आणि राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) महासंचालक सदानंद वसंत दाते उपस्थित होते, तर जम्मू आणि काश्मीरचे पोलिस महासंचालक (डीजीपी) नलिन प्रभात व्हर्च्युअल पद्धतीने बैठकीत सहभागी झाले होते.

### नाशिक, नागपूर, धाराशिव जिल्हा बँकांना
## ८२७ कोटींचे भागभांडवल

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**



नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँकांना भागभांडवल म्हणून ८२७ कोटी रुपये देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यात नाशिक जिल्हा बँकेला ६७२ कोटी, नागपूर जिल्हा बँकेला ८१ आणि धाराशिव जिल्हा बँकेला ७४ कोटी रुपये देण्यात येणार आहेत.

शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा बँक यांना एकूण ८२७ कोटी रुपये भागभांडवल स्वरूपात शासकीय अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले.

नाशिक जिल्हा बँकेस या आर्थिक वर्षात ३३६ कोटी आणि पुढील आर्थिक वर्षात ३३६ कोटी वितरित करण्यासही मान्यता देण्यात आली.

धाराशिव जिल्हा बँकेची स्थिती सातत्याने खालावत असल्याने या बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नियुक्त करण्यासाठी सहकार आयुक्तांना निर्देश देण्यासही मान्यता देण्यात आली.

राज्यातील न्यायालयांचा परिसर तसेच न्यायमूर्ती व न्यायाधीश यांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त ८२८२ सुरक्षारक्षक नियुक्तीस बैठकीत मान्यता देण्यात आली.
पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालातील शिफारशींचा कालावधी आणखी एक वर्षासाठी वाढविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. याशिवाय, आणखी काही निर्णय यावेळी घेण्यात आले.

## शिवसेना पक्ष, चिन्हावर आज निर्णायक सुनावणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या प्रतीकावरून सुरू असलेला राजकीय आणि कायदेशीर वाद आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. सर्वोच्च न्यायालय बुधवारी या प्रकरणावर अंतिम सुनावणी घेणार असून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या ऐतिहासिक खटल्याकडे लागले आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह वापरण्याची परवानगी केंद्रीय निवडणूक आयोगाने दिली होती. मात्र, या निर्णयाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर बुधवारी या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.

तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, ती तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल.
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा

तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल (https://udgam.rbi.org.in) पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.

ऑक्टोबर ते डिसेंबर 2025 दरम्यान देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या दावा न केलेल्या संपत्तीच्या खास शिबिरांमध्ये भेट द्या





अधिक माहितीसाठी भेट द्या: https://rbikehtahai.rbi.org.in
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: rbikehtahai@rbi.org.in
क्यूआर कोड स्कॅन करा
अधिकृत व्हॉट्सॲप नंबर 99990 41935

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

## अमृत दुर्गोत्सव २०२५ ला गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा बहुमान

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली आहे. संस्थेच्या अमृत दुर्गोत्सव २०२५ या उपक्रमाने 'मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम' या श्रेणीत गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदविला आहे.

या विक्रमाचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र देऊन अमृत संस्थेला सन्मानित करण्यात आले. या विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे सुपुर्द करण्यात आले.




## अरुण गुजराती दादांच्या राष्ट्रवादीत

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :**



शरद पवार यांचे जिवलग सहकारी, माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराती यांनी शरद पवारांची साथ सोडत अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयात अरुण गुजराती यांनी अधिकृतपणे अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याची माहिती आहे.
आज सकाळीच मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटर येथे अरुण गुजराती यांनी शरद पवारांची भेट घेतली. यावेळी ते म्हणाले, शरद पवार साहेबांसोबत आनंदाचा काळ गेला. ज्यांनी मला मोठे केले ते शरद पवार आणि ज्यांनी मला पुढे आणले ते माझे कार्यकर्ते. दोघांच्यामध्ये मी सँडविच झालो होतो. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला, अशी प्रतिक्रिया गुजराती यांनी दिली. कार्यकर्त्यांचा दबाव आणि आग्रह असल्याने आपण हा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले.

# अमित देशमुख यांच्याकडे काँग्रेसकडून मराठवाड्याची धुरा



**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका लक्षात घेऊन काँग्रेस पक्षाने तयारी सुरू केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांवर विभागनिहाय प्रभारीपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवली असून यात मराठवाडा विभागाची जबाबदारी माजी मंत्री आणि आमदार अमित देशमुख यांच्याकडे दिली आहे. यात विभागानुसार नेत्यांची नियुक्ती करताना त्या-त्या भागातील नेतृत्वाला महत्त्व दिले गेले आहे. मराठवाडा हा काँग्रेससाठी अत्यंत महत्त्वाचा विभाग मानला जातो. याच पार्श्वभूमीवर मराठवाड्यात पक्षसंघटन मजबूत करण्याची जबाबदारीदेखील अमित देशमुखांवर असेल.

# उच्च शिक्षण विभागांतर्गत मुंबईतील कार्यालये एकाच ठिकाणी होणार : चंद्रकांतदादा पाटील



**मुंबई :** उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेली काही महत्वाची कार्यालय आणि विभागीय कार्यालय मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी आणि काही भाडेत्त्वावरील जागेत आहेत. या सर्व कार्यालयांना एकाच ठिकाणी आणण्यासाठी चेंबूर येथे बांधकाम सुरू आहे. या बांधकामाला अधिक गती देऊन पुढील शैक्षणिक वर्षापूर्वी सर्व कार्यालये एकाच ठिकाणी सुरू करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज चेंबूर येथे उच्च शिक्षण विभागासाठी उभारण्यात येत असलेल्या नवीन इमारत प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे व संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, चेंबूर येथे उभारण्यात येत असलेल्या इमारतीत रुसा (आरयुएसए), राष्ट्रीय सेवा योजना, विभागीय सहसंचालक कार्यालय, शिक्षण शुल्क नियमन समिती, महा-सार्क यांसह उच्च शिक्षण विभागाची अन्य कार्यालये एकत्रितपणे कार्यरत होतील.

# विठ्ठलाच्या चरणी ५ कोटी १८ लाखांची देणगी अर्पण



**पंढरपूर :** पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात नुकत्याच पार पडलेल्या कार्तिकी वारीत वारकऱ्यांनी आणि भाविक भक्तांनी श्रींच्या चरणी उदंड दान अर्पण केले आहे. या वर्षीच्या यात्रेत एकूण 5 कोटी 18 लाख 77 हजार 228 रुपये इतके उत्पन्न देवस्थान समितीच्या खात्यात जमा झाले आहे. सोन्या-चांदीच्या दागिन्यांपासून ते हुंडीपेट्यांतील रोख देणग्या, लाडू प्रसाद विक्री, भक्तनिवास शुल्क अशा विविध माध्यमातून ही देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती मंदिरे समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी दिली. 22 ऑक्टोबर ते 5 नोव्हेंबर या कालावधीत भाविकांनी मोठ्या श्रद्धेने श्री विठ्ठलाच्या चरणी विविध स्वरूपात देणग्या अर्पण केल्या. श्रींच्या चरणाजवळील अर्पणातून 48 लाख 8 हजार 289 रुपये, देणगी स्वरूपात 1 कोटी 27 लाख 91 हजार 520 रुपये, लाडू प्रसाद विक्रीतून 54 लाख 16 हजार 500 रुपये, तर भक्तनिवासातून 71 लाख 59 हजार 910 रुपये एवढे उत्पन्न मिळाले. याशिवाय 1 कोटी 77 लाख 15 हजार 227 रुपये हुंडीपेट्यांतून जमा झाले असून पूजा, अगरबत्ती, चंदन, फोटो, महावस्त्रे आणि मोबाईल लॉकर आदी माध्यमातूनही जवळपास 6 लाख 70 हजार रुपये उत्पन्न मिळाले. सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या स्वरूपात 33 लाख 36 हजार 876 रुपये किंमतीची अर्पण वस्तू श्रींच्या खजिन्यात जमा झाली आहे. या वर्षीच्या उत्पन्नात मागील कार्तिकी वारीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. मागील वर्षी 3 कोटी 57 लाख 47 हजार 322 रुपये इतके उत्पन्न जमा झाले होते, तर यंदा 1 कोटी 61 लाख 29 हजार 906 रुपयांची वाढ नोंदवली गेली आहे. यात्रेचा कालावधी तुलनेने कमी असूनही भाविकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे मंदिर समितीचे उत्पन्न विक्रमी पातळीवर पोहोचले आहे.

# भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सुविधा तयार करा



## मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** राज्यातील ज्योतिर्लिंगांना वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविक भेट देतात हे लक्षात घेवून श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचा सर्वसमावेशक विकास आराखडा असावा. मंदिर परिसरातील सुरू असलेली कामे गतीने करून प्रस्तावित कामांचे योग्य नियोजन करा. या परिसरात भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करून भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीने कार्यवाही करण्याचे निर्देश सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थान येथे पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास सादरीकरणाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला मुख्य सचिव राजेश कुमार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग व्ही.राधा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, .नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी येणाऱ्या सध्याची भाविकांची व भविष्यातील संख्येनुसार दर्शन रांगांचे नियोजन, यात्रा उत्सव कालावधी हे लक्षात घेऊन मंदिर परिसरात प्रतिक्षा कक्ष, पिण्याच्या पाण्याची सोय, निवासाची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, परिसर साफसफाई करणे, माहिती फलक, पर्यटक स्वागत कक्ष, पार्किंग व्यवस्थापन, आपत्कालीन यंत्रणा, तिकीट कक्ष, आरोग्य सुविधा, उपहारगृह यासह पर्यटन वाढीला चालना देणारे उपक्रम या भागात प्रामुख्याने राबवा. स्थानिक नागरिक व प्रशासनाला विचारात घेऊन येथील कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था काटेकार असावी यासाठी खबरदारी घेण्यात यावी. अत्याधुनिक यंत्रणा तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने एकात्मिक सुरक्षा प्रणाली विकसित करा, जेणेकरून तात्काळ आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत मिळेल.मंदिर व्यवस्थापनासाठी काटेकोर नियम असणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धन व रोजगार निर्मितीसाठी पर्यटन विभागानेही येथील प्रस्तावित कामे गतीने करावीत. आज सादर झालेल्या आराखड्यांना उच्चस्तरीय समितीकडून मंजूरीनंतर निधी मिळेल. पुरातत्व विभागाकडून घेण्यात येणाऱ्या मंजुरीसाठी केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसोबत एक वेगळी बैठक आयोजित करावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. राज्यातील ज्योतिर्लिंगाच्या विकास आराखड्याची प्रभावी व तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त असलेले अधिकारी यांनी यावेळी विकास आराखड्यांचे सादरीकरण केले. पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा व श्री क्षेत्र भीमाशकर विकास आराखडा कुंभमेळा 2027 चे सादरीकरण सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथचे सादरीकरण वित्त विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर विकास आराखडा सादरीकरण अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी यांनी केले.

या बैठकीला नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के. एच. गोविंदराज, विधि व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, वित्त विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, पर्यटन विभागाचे सचिव संजय खंदारे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह,सचिव बांधकामे आबासाहेब नागरगोजे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव अप्पासाहेब धुळाज नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंग दूरदृश्यप्रणालीव्दारे नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम,पुणेचे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकात पुलकंडवार,छत्रपती संभाजी नगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर इतर विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# वारकऱ्यांच्या दिंडीत भरधाव कंटेनर शिरला

## ८ जण जखमी



■ **महासागर प्रतिनिधी, पिंपरी-चिंचवड, दि. ११ :** कार्तिकी एकादशी वारीला निघालेल्या वारकऱ्यांच्या दिंडीत भरधाव कंटेनर शिरल्याने महिला वारकऱ्याचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले आहेत. ही घटना आज सकाळी ६ च्या सुमारास घडली आहे. प्रियांका तांडेल वय-५५ वर्षे असे मृत झालेल्या महिला वारकऱ्याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उरण येथून आळंदीच्या कार्तिकी वारीसाठी श्री दावजी पाटील दिंडी निघाली होती. कामशेत घाटात सकाळी पायी दिंडी असताना चालकाचे नियंत्रण सुटलेला भरधाव कंटेनर दिंडीत शिरला. आरडाओरडा झाला. कंटेनरने वारकऱ्यांना धडक दिली. घटनेत वारकरी महिलेचा मृत्यू झाला असून आठ वारकरी जखमी आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं आहे. त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. ही घटना जुना पुणे-मुंबई महामार्गावर घडली. अपघातानंतर काही वेळ वाहतूक कोंडी झाली होती.

## कृषी विभागाला मिळाले नवे बोधचिन्ह

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात राज्य कृषी विभागाच्या नवीन बोधचिन्हाचे तसेच 'शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी' या नवीन घोषवाक्याचे अनावरण केले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री गिरीश महाजन, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश कुमार, कृषि आयुक्त सुरज मांढरे, उपसचिव प्रफुल्ल ठाकूर, संचालक रफिक नाईकवाडी, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

"महाराष्ट्राची शेती ही परंपरेशी जोडलेली असूनही सतत नव्या दिशेने वाटचाल करणारी आहे. कृषी विभागाचे हे नवे बोधचिन्ह म्हणजे केवळ प्रतीक नाही, तर महाराष्ट्राच्या शेतीचा आधुनिक चेहरा आहे. या लोगोमधून शेतकऱ्यांची शक्ती, तंत्रज्ञान, आणि पर्यावरणपूरक विकासाचा संदेश दिला आहे. हे बोधचिन्ह आणि घोषवाक्य राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या प्रगतीचे प्रतीक बनेल. हा बदल म्हणजे नव्या युगातील नव्या कृषी विचारांचा आरंभ आहे. अशी भावना यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, "कृषी विभागाचे विद्यमान बोधचिन्ह ३८ वर्षांपूर्वी तयार करण्यात आले होते. या कालावधीत शेतीत तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण, नैसर्गिक शेती, हवामानबदल आणि उत्पादनाच्या नव्या दिशा अशा अनेक मूलभूत परिवर्तनांच्या पार्श्वभूमीवर विभागाची दृश्य आणि संवादात्मक ओळख अद्ययावत करण्याची गरज निर्माण झाली होती. या उद्देशाने कृषी विभागाने खुली स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत जास्तीत जास्त प्रस्ताव प्राप्त व्हावे यासाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळावर सार्वजनिक आवाहन समावेशित करण्यात आले. कला महाविद्यालयातील आणि कृषी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, कलाकार, डिझायनर्स, लेखक, अधिकारी, कर्मचारी आणि अन्य इच्छुक व्यक्तींना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या स्पर्धेला अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला ज्यात एकूण ७६१ बोधचिन्ह प्रस्ताव आणि ९४९ घोषवाक्य प्रस्ताव प्राप्त झाले."

भरणे पुढे म्हणाले, "प्राप्त प्रस्तावांचे परीक्षण करण्यासाठी कृषी आयुक्तांच्या मान्यतेने समिती गठित करण्यात आली. या समितीने प्रत्येक प्रस्तावाचा तपशीलवार अभ्यास करून उत्कृष्ट कल्पनांची निवड केली. अंतिम निवड समितीने शासनास प्रत्येकी तीन बोधचिन्ह आणि तीन घोषवाक्यांची शिफारस केली, ज्यापैकी एकाची अंतिम निवड शासनाने केली. ७ नोव्हेंबर २०२५ ला या नव्या बोधचिन्ह आणि घोषवाक्याला कृषी विभागाकडून मान्यता देण्यात आली आणि आज याचं अनावरण करण्यात आले.

# तंत्रज्ञानावर आधारित अद्यावत टोल नाका सुरू करा



परिवहन मंत्री सरनाईकांचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** मुंबईच्या उत्तरेकडील प्रवेशद्वारावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा आणि वायू प्रदूषणाचा त्रास संपविण्यासाठी दहिसर टोलनाक्याऐवजी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून टोल भरणा प्रक्रिया वेगवान करण्याचा नवा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला सहाय्यक पोलिस आयुक्त अनिल कुंभारे (बृहन्मुंबई पोलिस आयुक्तालय), भारतीय राष्ट्रीय महामार्ग, दत्ता शिंदे (अतिरिक्त पोलिस आयुक्त मिरा - भाईंदर), प्राधिकरणाचे संचालक अंन्शुमली श्रीवास्तव, प्रकल्प संचालक सुहास चिटणीस, जयंत म्हैसकर (मुख्य व्यवस्थापकीय संचालक टएढ इन्फास्ट्रकचर , न.कृ. वेंगुर्लेकर (सहाय्यक आयुक्त ब्रह्ममुंबई महापालिका) दिपक खांबित ( नगर अभियंता,मिरा -भाईंदर) आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, दहिसर टोलनाक्यावर दररोज प्रचंड वाहतूक कोंडी होत असून त्यामुळे ॲम्बुलन्स, स्कूल बस आणि अत्यावश्यक सेवांना अडथळा निर्माण होतो. यामुळे प्रदूषणात भर पडते आणि प्रवाशांचा मौल्यवान वेळ वाया जातो. हा टोल नाका स्थलांतरित करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. परंतु स्थानिक नागरिकांनी टोल नाक्याच्या स्थलांतरनाला विरोध केला आहे. त्याची बाजू देखील रास्त असून त्यांच्या भूमिकेचा विचार करून टोल नाक्यावरील गर्दी टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवीन टोल भरणा प्रक्रिया चालू करण्यासंबंधीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सध्याचा टोल नाका कायमस्वरूपी बंद करणे शक्य होईल.

मंत्री सरनाईक यांनी पुढे सांगितले की, टोल वसुली अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (अक) आधारित तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करावी. वाहनांच्या नंबर प्लेट स्कॅन करणाऱ्या अक कॅमेऱ्यांद्वारे स्वयंचलित टोल भरणा होईल, ज्यामुळे टोल नाक्यांवरील लांबच लांब रांगा भूतकाळात जातील. तसेच, दोन टोलनाक्यांचा भरणा एकाच ठिकाणी करण्याची संकल्पना अमलात आणल्यास वाहतूक आणखी सुरळीत होईल.

# कोल्हापुरात धुमाकूळ घालणारा बिबट्या अखेर जेरबंद

■ **महासागर प्रतिनिधी, कोल्हापूर, दि. ११ :** एका बिबट्याने आज कोल्हापूर शहरात चांगलाच धुमाकूळ घातला. हा बिबट्या मंगळवारी सकाळीच शहरातील ताराबाई पार्क परिसरात शिरला. यामुळे सकाळच्या कामात गुंग असणाऱ्या नागरिकांत एकच दहशत पसरली. त्यानंतर त्याला पकडण्यासाठी आलेल्या एका पोलिस कर्मचाऱ्यावर त्याने झडप घातली. त्यात हा पोलिस किरकोळ झडप घातली. अखेर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्याला जेरबंद केले आणि कोल्हापूरकरांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, बिबट्याने शहरातील ताराबाई पार्क परिसरातील एका हॉटेलच्या गार्डनमध्ये उडी घेत तेथील एका कर्मचाऱ्यावर हल्ला केला. त्यानंतर याच ठिकाणी असलेल्या महावितरणच्या कार्यालयातील एका चेंबरमध्ये लपून बसला. तिथे त्याने जवळपास 2-3 तास ठाण मांडले. तो काही केल्या बाहेर येत नव्हता. तोपर्यंत घटनास्थळी पोहोचलेल्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी चेबरबाहेर जाळी टाकून त्याच्या पळण्याच्या वाटा बंद केल्या. याकामी त्यांना पोलिस प्रशासनासह महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी मदत केली.

अखेर बिबट्या चेंबरबाहेर आला आणि अलगद जाळ्यात अडकला. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी त्याच्यावर झडप घालून त्याला नियंत्रणात आले. या झटापटीत बिबट्याने एका कर्मचाऱ्याला हाताला चावा घेतला. पण त्यानंतरही त्यांनी बिबट्याला सोडले नाही. हा बिबट्या शहरी भागात कुठून आला याविषयी संभ्रम आहे.

# नाशिकमधील रुई राज्यात सर्वात थंड

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :** राज्यात थंडीचा कडाका वाढला असून सोमवारी (१० नोव्हेंबर) नाशिकच्या निफाड तालुक्यातील रुई येथे नीचांकी ८ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली असून ते राज्यातील सर्वात थंड ठिकाण ठरले. नाशिकमध्ये पारा १०.८, निफाडमध्ये ९.५ तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ११.८ वर होता. दरम्यान, राज्यात उद्यापर्यंत (१२ नोव्हेंबर) नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली, डहाणू, छत्रपती संभाजीननगर, जालना, बीड, धाराशिव, नांदेड, परभणीत पारा सरासरीपेक्षा ४ अंशांनी घसरण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

## आपले सरकार सेवा केंद्र नागरिकांच्या विश्वासाचे प्रतिक व्हावे : ॲड. आशिष शेलार

# २३८ आपले सरकार सेवा केंद्रांचे वितरण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** शासनाने सुरू केलेली आपले सरकार सेवा केंद्र ही योजना नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवांचा सुलभ लाभ मिळवून देण्यासाठी आहे. त्यामुळे मुंबई उपनगरातील प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्र हे नागरिकांच्या विश्वासाचे प्रतीक व्हावे, अशी अपेक्षा माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केली

चेतना महाविद्यालय येथील सभागृहात आयोजित आपले सरकार सेवा केंद्र वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपजिल्हाधिकारी सुभाष काकडे तसेच मुंबई उपनगरातील आपले सरकार सेवा केंद्र चालक उपस्थित होते. पालक मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, आज जगभर माहिती तंत्रज्ञानाच्या नव्या युगात सायबर धोकेही वाढले आहेत. महाराष्ट्राचा सायबर सुरक्षा सेल सक्षम आहे, तरीही प्रत्येक सेवा केंद्राने जबाबदारीने काम करून नागरिकांची माहिती सुरक्षित ठेवावी. तंत्रज्ञानाचा वापर काळजीपूर्वक करावा.



2018 च्या शासन निर्णयानुसार 25 हजार लोकसंख्येच्या मागे एक सेवा केंद्र होते, आता ती संख्या वाढवून दोन केंद्रे करण्यात आली आहेत. या माध्यमातून नागरिकांना दाखले, प्रमाणपत्रे, नॉन-क्रीमीलेअर, अधिवास, उत्पन्न दाखला अशा एक हजारहून अधिक सेवांचा लाभ मिळतो. शासकीय कार्यालयात वारंवार फेऱ्या न मारता, नागरिकांना त्यांच्या परिसरातच सेवा मिळावी, हा या योजनेचा हेतू असल्याचेही पालकमंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले. महाराष्ट्र शासन लवकरच सेवा केंद्रांच्या ब्रँडिंगसाठी व्यावसायिक संस्थेशी करार करणार असून, केंद्रांच्या कामकाजात एकसंध आणि व्यावसायिकता आणली जाणार असल्याचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले. यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्यातील 238 सेवा केंद्रांना प्रमाणपत्रे देण्यात आली. यात 7 दिव्यांग व्यक्तींना तर एका तृतियपंथीयाचासुद्धा सहभाग आहे.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार म्हणाले की, आपले सरकार सेवा वितरण अधिक कार्यक्षम करण्यासाठी तांत्रिक सुधारणा राबविण्यात येत आहे. व्हॉट्सअपद्वारे प्रमाणपत्र पाठविणे, अर्ज प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणे सर्व आपले सरकार तसेच आधार केंद्रांचे जिओ-टॅगिंग पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांना त्यांच्या जवळच्या सेवा केंद्राचे ठिकाण गुगल मॅप व व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे सहजपणे कळू शकते.

जिल्हाधिकारी श्री.कटियार म्हणाले की, तहसील कार्यालयातील सेतू केंद्रांचे आधुनिकिकरण सुरू असून, जशी सुविधा पासपोर्ट कार्यालयात मिळते तशीच सुविधा नागरिकांना सेतू कार्यालयात मिळणार आहे. अंधेरी तालुक्यात प्रभागनिहाय 54, बोरीवली तालुक्यात प्रभागनिहाय 67 व कुर्ला तालुक्यात प्रभागनिहाय 117 आपले सरकार सेवा केंद्राचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. उपजिल्हाधिकारी (संगांयो), राजेंद्र पाटोळे, उपविभागीय अधिकारी, प्रशांत ढगे, तहसीलदार, राजेंद्र चव्हाण, तहसीलदार अंधेरी, स्नेहलता स्वामी उपस्थित होते, तहसीलदार, राजेंद्र चव्हाण यांनी आभार मानले.

# दोन कारच्या रेसमध्ये भीषण अपघात

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :** पुण्यातील हडपसर परिसरात दोन कारच्या रेसमध्ये एका भरधाव मोटारीचे नियंत्रण सुटून सहा वाहनांना धडक बसली. हा अपघात सोमवारी रात्री हांडेवाडीतील श्रीराम चौकात घडला. या घटनेत चार जण जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी मोटारचालक प्रशांत रमेश पाटील (वय ४५, रा. ससाणेनगर, हडपसर) याला काळेपडळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाटील याने मद्यपान केले असण्याची शक्यता आहे. पाटील हा हडपसरमधील हांडेवाडी परिसरातून भरधाव वेगात जात होता.

यावेळी त्याने एका अल्टो कार चालकाशी रेस लावली. श्रीराम चौकात पाटीलचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि त्याने एकापाठोपाठ सहा वाहनांना धडक दिली. यात दुचाकी आणि मोटारींचे मोठे नुकसान झाले.

# एआयच्या युगात जबाबदार पत्रकारितेचा नवा दृष्टिकोन घडवा : मनीषा वर्मा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** पत्रकारिता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांच्या संगमातून केवळ तांत्रिक कौशल्य नव्हे, तर जबाबदार वृत्तनिर्मितीची नवीन मानसिकता घडविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी केले.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वृत्तपत्र तसेच डिजिटल माध्यम पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रशिक्षण कार्यक्रमांच्या उद्घाटनप्रसंगी वर्मा बोलत होत्या. या कार्यक्रमात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.अपूर्वा पालकर, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे दिलीप सपाटे तसेच वृत्तपत्रे, डिजिटल मीडिया आणि न्यूज एजन्सीजमधील पत्रकार उपस्थित होते.

अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती वर्मा म्हणाल्या की, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण हे सर्वांसाठी एकसारखे नसावे. प्रत्येकाचा अनुभव आणि तांत्रिक प्रावीण्य ओळखून प्रशिक्षण याची रचना संरचित केले पाहिजे. केवळ साधनांची ओळख न देता, त्यांचा हॅन्ड्स-ऑन वापर शिकविणे ही खरी गरज असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रशिक्षणामध्ये एआय इन न्यूज ब्रॉडकास्टिंग, एआय एथिक्स इन रिपोर्टिंग,



नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, फॅक्ट चेकिंग, ट्रान्सलेशन टूल्स, चॅट जीपीटी, ग्रामर्ली, गुगल ट्रान्सलेट अशा अनेक प्रायोगिक सत्रांचा समावेश आहे. प्रशिक्षणाच्या प्रत्येक दिवशी शिकण्याचा आलेख चढता राहील आणि शेवटच्या दिवशी सहभागी अधिक आत्मविश्वासाने एआयचा वापर करू शकणार असल्याचे वर्मा यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेवरील हे प्रशिक्षण केवळ कोर्स म्हणून नव्हे, तर ज्ञानयुगाच्या नव्या दिशेने उचललेले पाऊल म्हणून घ्या. जगभरातील न्यूयॉर्क टाइम्स, गार्डियन, पीटीआय, हिंदुस्तान टाइम्स यांसारख्या माध्यमांनी एआयचा अंगीकार केला आहे. महाराष्ट्रातील पत्रकारितेलाही हे नवे युग आत्मसात करावे लागेल. आपले उद्दिष्ट केवळ तांत्रिक प्रगती नसून, एथिकल जर्नालिझमच्या मूल्यांसह तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर करणे हे असले पाहिजे. लोकशाही संस्थांना बळकट करण्यासाठी माध्यमांची भूमिका अधिक प्रभावी व्हावी, यासाठी एआयचे ज्ञान अत्यावश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## इसमाचा मृतदेह विहिरीत आढळला



**कुऱ्हा**– धामणगाव रेल्वे रस्त्यावर विद्यानिकेतन विद्यालयासमोर सागर जारी यांच्या शेतातील विहिरीत एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मंगळवारी (दि. 11 नोव्हेंबर) दुपारी ही घटना उघडकीस आली. मृत व्यक्तीची ओळख सुधाकर विठ्ठल काळे (54, रा. धारवाडा) अशी झाली असल्याचे कुऱ्हा पोलिसांनी सांगितले.

सुधाकर काळे हे शनिवारी (दि. 7 नोव्हेंबर) कुऱ्हा येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी आले होते. मात्र, उपचारादरम्यान ते रुग्णालयातून निघून गेले आणि त्यानंतर घरी परतले नाहीत. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला, परंतु त्यांचा काहीही ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे 8 नोव्हेंबर रोजी त्यांच्या बेपत्ता होण्याची तक्रार कुऱ्हा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.मंगळवारी सागर जारी यांच्या शेतातील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे पाठविला. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुढील तपास ठाणेदार डॉ. अनुप वाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल निंघोट करीत आहेत.

# अनेकांचे काम बनले, तर काहींचे गणित बिघडले!

## अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर

### 44 जागा महिलांसाठी राखीव

### उमेदवार ठरविण्याची लगबग

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.11 ) - अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत मंगळवारी ( दि. 11 नोव्हेंबर ) पारदर्शक पद्धतीने जाहीर करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सकाळी 11 वाजता आयुक्त सौम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया पार पडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त मेघना वासनकर आणि निवडणूक अधिकारी भूषण राठोड उपस्थित होते.*

*सोडतीदरम्यान सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, संभाव्य उमेदवार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारदर्शकता राखण्यासाठी सोडतीतील चिठ्ठ्या महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आल्या. जेवड नगर शाळेतील चौथी 'अ' व 'ब' वर्गातील विरा हनवते, मसिरा शेर खान, सम्यक कटकतलवारे, ईश्वरी कराळे आणि युवराज मते या विद्यार्थ्यांनी चिठ्ठ्या काढल्या.*







### 17 ते 24 नोव्हेंबर पर्यंत हरकतींचा स्विकार

आरक्षणासंदर्भातील हरकती व सूचना 17 ते 24 नोव्हेंबर या कालावधीत दुपारी 3 वाजेपर्यंत राजकमल चौक येथील महापालिका मुख्यालयातील निवडणूक कार्यालयात स्वीकारल्या जातील.

### अश्या आहेत महापालिकेची रचना

अमरावती महानगरपालिकेत 22 प्रभाग असून एकूण 87 जागांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. 21 प्रभागांत प्रत्येकी 4 जागा तर प्रभाग क्र. 9 मध्ये 3 जागा आहेत. एकूण 87 पैकी 15 जागा अनुसूचित जातींसाठी, 2 जागा अनुसूचित जमातींसाठी, 23 जागा इतर मागास प्रवर्गासाठी तर उर्वरित सर्वसाधारण आहेत. विशेष म्हणजे 44 जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

### 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या

एकूण लोकसंख्या – 6,47,057

अनुसूचित जाती –1,11,435

अनुसूचित जमाती – 15,955

### राजकीय हालचालींना वेग

या आरक्षण सोडतीनंतर शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. अनेक प्रभागांमध्ये 2017 प्रमाणेच आरक्षण कायम राहिल्याने काही संभाव्य उमेदवारांचा आनंद द्विगुणित झाला, तर काहींची राजकीय गणिते पूर्णपणे बदलली आहेत. विविध पक्षांनी नव्या आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर उमेदवार ठरविण्याची लगबग सुरू केली आहे.

प्रभागनिहाय आरक्षण (22 प्रभाग ङ्क 87 जागा)

**प्रभाग 1 – शेगाव-रहाटगाव**– (अ) अ.जा. महिला, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 2** – संत गाडगेबाबा पीडीएमसी– (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 3– नवसारी** – (अ) अ.जा. महिला, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 4–जमिल कॉलनी–लालखडी** – (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 5 – महेंद्र कॉलनी–नवीन कॉटन मार्केट** – (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 6 – विलास नगर–मोरबाग–गवळीपूरा**– (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 7 – जवाहर स्टेडियम** – (अ) अ.जा. महिला, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 8 – जोग स्टेडियम–चपराशीपुरा**– (अ) अ.जा. महिला, (ब) अ.जमाती, (क) ना.मा.प्र. महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 9 – एसआरपीएफ–वडाळी** – (अ) अ.जा., (ब) अ.जमाती महिला, (क) सर्वसाधारण महिला

**प्रभाग 10 – बेनोडा भिमटेकडी–दस्तुर नगर**– (अ) अ.जा. महिला, (ब) ना.मा.प्र. महिला, (क) सर्वसाधारण, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 11 – फ्रेजरपुरा–रुख्मिणी नगर** – (अ) अ.जा. महिला, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 12 – स्वामी विवेकानंद कॉलनी–बेलपूरा**– (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 13 – अंबापेठ–गोरक्षण–नमुना** – (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 14 – जवाहर गेट–बुधवारा**– (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 15 – छाया नगर–पठाणपुरा** – (अ) ना.मा.प्र. महिला, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 16 – अलिम नगर–रहमत नगर** – (अ) ना.मा.प्र. महिला, (ब) सर्वसाधारण महिला, (क) सर्वसाधारण, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 17 – गडगडेश्वर–रवि नगर** – (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 18 – राजापेठ–श्री संत कंवरराम नगर** – (अ) ना.मा.प्र. महिला, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 19 –साई नगर–अकोली** – (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 20 – सुतगिरणी–सामरा नगर** – (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला, (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 21 – जुनी वस्ती बडनेरा** – (अ) अ.जा. महिला, (ब) ना.मा.प्र. महिला, (क) सर्वसाधारण, (ड) सर्वसाधारण

**प्रभाग 22 ङ्क नवी वस्ती बडनेरा** – (अ) अ.जा. महिला, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला, (ड) सर्वसाधारण





## कंटेनरमधून गोवंश तस्करी उघड

### 36 जनावरे, वाहन व मोबाईलसह 18.75 लाखांचा मुद्देमाल जप्त

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 11 )**– गोवंश जातीच्या जनावरांची कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्या तस्करांवर स्थानीक गुन्हे शाखेने (स्था.गु.शा.) कारवाई करत तीन आरोपींना अटक केली आहे. कंटेनरमधून 36 गोवंश जातीची जनावरे, वाहन आणि मोबाईलसह एकूण 18 लाख 75 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या सूचनेनुसार, गोवंश तस्करीवर नियंत्रण आणण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली होती. त्या मोहिमेअंतर्गत 11 नोव्हेंबर रोजी पो.उप.नि. विशाल रोकडे व त्यांचे पथक लोणी परिसरात पेट्रोलिंग करीत असताना, गोपनीय माहितीवरून कारंजा लाड–अमरावती रोडवर नाकाबंदी करण्यात आली. माहितीनुसार, एका कंटेनरमध्ये जनावरांचे पाय व तोंड बांधून निर्दयपणे कत्तलीसाठी नेले जात होते. पथकाने मातोश्री ढाब्याजवळ वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी



पाठलाग करून कंटेनर पकडला. तपासणीअंती त्यामध्ये 36 जनावरे (किंमत 3.60 लाख रुपये), तीन मोबाईल (15 हजार रुपये) आणि अशोक लेलँड कंटेनर (15 लाख रुपये) असा एकूण 18.75 लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणात चालक मोहम्मद सलीम मोहम्मद हानिफ (40), शारीक खान कुदरतउल्ला खान (34) व शे. नसीर शे. यासीन (39, तिघेही रा. मुर्तीजापूर, जि. अकोला) यांना अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस स्टेशन लोणी करत आहे. ही कारवाई पो.उप.नि. विशाल रोकडे यांच्या नेतृत्वाखाली पो.अंमलदार संतोष तेलंग, दीपक पाल, राजेश कासोटे, दीपक पाटील व चालक किशोर सुने यांनी केली.

## अवैध गुटखा वाहतूक करणारा कंटेनर जप्त

### शिरखेड पोलिसांची धडक कारवाई–एक आरोपी अटकेत, 1.22 कोटींचा मुद्देमाल जप्त

महासागर | प्रतिनिधी

**शिरखेड, ( दि. 11 )** – अमरावतीकडे अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्या कंटेनरवर शिरखेड पोलिसांनी कारवाई करत तब्बल 1 कोटी 22 लाख 35 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून इतर तिघांचा शोध सुरू आहे.

दि. 10 नोव्हेंबर रोजी सपोनि ईश्वर वर्गे यांच्या मार्गदर्शनाखालील पथक पेट्रोलिंगवर असताना गोपनीय माहितीच्या आधारे शिरखेड फाट्यावर नाकाबंदी



करण्यात आली. दरम्यान, आर जे 14/जीएल0020 क्रमांकाचा कंटेनर अडवण्यात आला. चालकाने आपले नाव राहुल भब्बल (32, रा. गवालदा, तिजारा, अलवर, राजस्थान) असे सांगितले. चौकशीअंती त्याने कंटेनरमध्ये गुटखा असल्याचे मान्य केले.

11 नोव्हेंबर रोजी अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम दंदे यांच्या उपस्थितीत तपासणी करण्यात आली. कंटेनरमध्ये 175 मोठ्या पोत्यांमध्ये हॉट प्रिमियम पान मसाला व ॥–5 सुगंधित तंबाखूचे एकूण 77 लाख 35 हजार रुपयांचे पॅकेट आढळून आले. वाहनासह एकूण मुद्देमालाची किंमत 1 कोटी 22 लाख 35 हजार रुपये इतकी आहे.

या प्रकरणात राहुल भब्बल याला अटक करण्यात आली असून इतर तीन आरोपींचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. ईश्वर वर्गे व त्यांच्या पथकाने केली.

## कुष्ठरुग्ण शोध अभियान 17 पासून सुरू

**अमरावती** – संपूर्ण महाराष्ट्रभर राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत दिनांक 17 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर 2025 या कालावधीमध्ये कुष्ठरुग्ण शोध अभियान राबविण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी अभियानाच्या नियोजनासाठी अमरावती जिल्ह्याची जिल्हास्तरीय समन्वय समिती सभा जिल्हाधिकारी आशिष येरेकर तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे संपन्न झाली.


## जाहिरात

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत श्री शिवप्रसाद भावलाल मावस्कर रा. धुळघाट रोड ता. धारणी यांचा जन्म दिनांक 10/07/1967 रोजी गांव धुळघाट रोड ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत धुळघाट रोड ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**शिवप्रसाद भावलाल मावस्कर**

Kausalya Shrungare Education Foundation's
**Vidyaniketan College of Pharmacy**
**Anjangaon Surji**
**(Approved by PCI, DTE, MSBTE & DBATU)**

**ADMISSION NOTICE FOR A.Y. 2025-26**

**For vacancy (if any) Under Against CAP/ Institute Level First Year**

**D. Pharm & B. Pharm Course**

Applications are invited from the eligible candidates in prescribe admission form available at college office, for the against CAP admission (seat remain vacant after CAP round) & Institute Level quota admission to D. Pharm First Year & B. Pharm First Year for academic year 2025-26.
Eligibility: As per the norms prescribed by DTE & Government of Maharashtra.

**Admission Schedule 2025-26**

| Sr. No. | Activity | Schedule for D. Pharm & B. Pharm First Year |
|---|---|---|
| 1 | Submission of duly filled admission request form. | 11-11-2025 to 13-11-2025 (up to 5:00 pm) |
| 2 | Display of provisional merit list | 14-11-2025 (at 3:00 pm) |
| 3 | Objections/ Grievances if any pertaining to provisional college merit list | 15-11-2025 (at 3:00 pm) |
| 4 | Display of Final Merit List | 16-11-2025 (at 5:00 pm) |
| 5 | Confirmation of Admission | 17-11-2025 (at 5:00 pm) |

Note: - If there will be change in schedule form competent authority then it will be display on college notice board.

**Contact**
**9325884547, 9665811933, 9730246087**

**Principal**
Vidyaniketan College of Pharmacy, Anjangaon Surji


## खुनाचा प्रयत्न करणारे दोन आरोपी जेरबंद

### फ्रेजरपुरा पोलिसांची धडक कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 11 )** शहरातील वडाळी रोडवरील गिरजाघराजवळ एका वृद्धावर चाकूने वार करून खुनाचा प्रयत्न करणाऱ्या दोन तरुणांना फ्रेजरपुरा पोलिसांनी अल्पावधीतच अटक केली आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहायक पोलिस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

घटना 7 नोव्हेंबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. अरुण लोडाजी आठवले (70) हे आपल्या भावाकडे सायकलने जात असताना गिरजाघराजवळ दोन युवक उभे होते. त्यांनी वृद्धाकडे पाहून हसल्याने आठवले यांनी त्यांना विचारले, का हसताय? यावरून वाद झाला आणि दोघांनी त्यांच्यावर चाकूने हल्ला केला. एका आरोपीने त्यांच्या मांडीत वार केला, तर दुसऱ्याने मागून धरून पोटात दोन वार केले. नंतर गोट्यांनी मारहाण करून आरोपी पसार झाले.

गंभीर जखमी अवस्थेत आठवले यांना सावदेकर रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम राबवून साहिल राहुल भगत (19, रा. अशोक वाटिका, वडाळी) आणि त्याच्या साथीदाराला अटक केली. चौकशीत दोघांनी वादातून हल्ला केल्याची कबुली दिली. दोघेही पूर्वीपासून गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट यांच्या पथकाने केली.


ग्राम पंचायत कार्यालय जैनपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती

**निविदा सूचना क्र. ०१ दिनांक १०/११/२०२५**

ग्राम पंचायत कार्यालय जैनपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती यांचे मार्फत अनु.जाती व बौद्ध घटक वस्तीचा विकास योजने अंतर्गत खालील कामाची मोहरबंद निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये जि.प. बांधकाम विभाग यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारा कडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय जैनपूर , ता. दर्यापूर , जि. अमरावती यांचा कडून देण्यात येतील.

| अक्र | कामाचे नाव | लेखाशिर्षक | अंदाजित किंमत रुपये (लाख) | बयाना रक्कम (१%) | कामाची मुदत महीने | निविदा प्रसिद्धीची वेळ | पंजीबद्ध कंत्राटदाराचे वर्गीकरण | कोऱ्या निविदेची किंमत | कोऱ्या निविदा देण्याची व स्वीकृतीची तारीख व वेळ | निविदा उघडण्याचा तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जैनपूर येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे, | अनु.जाती व बौद्ध घटक वस्तीचा विकास | ५,००,०००/- | ५,०००/- | ६ महिने | प्रथम | ५ व त्यावरील | २००/- | १०/११/२०२५ ते १७/११/२०२५ | १८/११/२०२५ दु. १.०० वाजता |

टिप :
१) निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय जैनपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) निविदा ह्या दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत.
३) निविदा स्वीकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार सरपंच/सचिव यांनी राखून ठेवलेले आहे.

सरपंच/सचिव
ग्रामपंचायत कार्यालय जैनपूर

# भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू

हजारो वर्षांच्या राजेशाहीच्या श्रुंखला व जवळ-जवळ दिनशे वर्षाच्या ब्रिटिशांच्या जुलमी गुलामगिरीतून भारतास स्वातंत्र्य व सार्वभौम सत्ताप्राप्त झाली. आशा वेळी देशाची सर्व सूत्रे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हातात आलेली होती. त्यावेळी भारतीय संस्कृतीच्या, परंपरेच्या व महापुरुषांच्या विचारांना पायदळी तुडवत, ठराविक कांही लोकांशी व संस्थांशी हाताशी धरून, देशाचा सर्वशक्तिमान नेता होऊन, हुकूमशाही स्वरूपाचा सम्राट पंडित जवाहरलाल नेहरूंना सहज होता आले असते. परुंतु त्यांच्यात असलेले महापुरुषांचे विचार व देशाबद्दलची आंतरिक आत्मीयता व प्रेम यामुळे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आदर्शवादाचा व नैतिक मूल्यांचा स्वीकार करून देशहिताला अधिकाधिक प्राधान्य दिले.

--------------------

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जागतिक पटलावर आनेक बदल होऊन, जगाचे वैचारिक व आर्थिक दृष्ट्या भांडवलशाहिवादी अमेरिका व साम्यवादी किंवा समाजवादी विचारांचा रशिया आशा दोन गटात जगाची एकीकडे विभागणी झाली होती, तर दुसरीकडे नवस्वातंत्र्य प्राप्त अनेक राष्ट्रांची संख्या वाढत होती.

अशाच काळात म्हणजेच १५ ऑगस्ट १९४७ राजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून तर मुक्त झाला होता, परंतु भरतासमोर दारिद्य, भूकमारी, धार्मिक दंगली औद्योगिक प्रश्न, शेतक?्यांचे प्रश्न, रोजगाराचे प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न हे व असे अनेक प्रश्न भारता समोर आ वासून उभे होते. आशा या परिस्थितीच्या काळात पंडित जवाहरलाल नेहरूंकडे भारताची सत्ता आली होती. आशा वेळी पंडित जवाहरलाल नेहरू हे खचून न जाता भारतीय संस्कृती व परंपरेप्रमाणेच महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेत एका नव्या भारताच्या उभारणीसाठी आयुष्याच्या शेवटपर्यंत प्रयत्नशील राहिले आहेत.

पंडित जवाहरलाल नेहरू हे जागतिक स्तरावर आणि तत्कालीन सामान्य भारतीय जनमानसात मान्यता पावलेले प्रतिभासंपन्न नेते होते. स्वातंत्र्या पूर्वीपासूनच देश-विदेशातील राजकारणामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू हे अतिशय सक्रिय होते. आणि त्यामुळेच भारतासारख्या नवस्वातंत्र्य व सार्वभौम सत्ताप्राप्त देशाचा नेता हा जागतिक राजकीय पटलावर प्रतिभासंपन्न असण्याची उणीव पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या रूपाने भरून निघणार होती.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय परराष्ट्र धोरणाचा एक नवा जागतिक मान्यता प्राप्त असा आकृतिबंध तयार करताना भारतीय संस्कृती, परंपरा व महात्मा गौतम बुद्ध ते महात्मा गांधी आशा सर्वच विचारांच्या महापुरुषांच्या विचारातील आदर्श तत्त्वांचा स्वीकार करून, एक आदर्शवादी व नैतिक मूल्यांना अतिशय महत्वाचे स्थान देणारे, भारतीय संस्कृती, भारतीय परंपरा, भारतीय तत्त्वज्ञानाच्या मूल्यांचा वापर करून भारताच्या परराष्ट्र धोरणाचा नवा आकृतिबंध तयार करून, त्यांनी देशाला नवी दिशा देण्याचे कार्य केले. त्यामुळेच पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात.

ज्या प्रकारे मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे, तो एकाकी जीवन जगू शकत नाही. त्याच प्रकारे कोणतेही राष्ट्र पूर्णपणे स्वयंपूर्ण नसते. प्रत्येक राष्ट्राला आपल्या विकासासाठी व जनतेच्या हितासाठी इतर राष्ट्रांची मदत ही घ्यावीच लागत असते. त्यामुळे प्रत्येक स्वातंत्र्य व सार्वभौम राष्ट्र आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करत असते.

कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण निर्धारित करत असताना ज्या पद्धतीने एखाद्या कुटुंबाची सर्वस्वी जबाबदारी त्या कुटुंब प्रमुखाची असते, त्याच पद्धतीने एखाद्या राष्ट्राच्या सर्वांगीण हिताचे निर्णय घेण्याची जबादारी ही त्या-त्या देशातील शासनाची म्हणजेच शासन प्रमुखांची असते. त्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारित करताना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी विश्वशांतीला प्राधान्य देऊन, साम्राज्यवाद व वंशवादाला कडाडून विरोध केला आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी पासूनच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणात सक्रिय होते. त्यांनी जगातील अनेक देशांचा प्रवास करून तेथील परिस्थितीचा अभ्यास केलेला होता. आणि तसेच पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देश-विदेशातील अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग नोंदवला होता. त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरूंच्या या अनुभवाचा उपयोग देशाला नवी दिशा देण्यासाठी झाला आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते, परराष्ट्र धोरण म्हणजे केवळ राष्ट्रीय हितसंबंध साधण्याचे साधन नाही, तर देशातील विकास घडवून आणण्याबरोबरच जागतिक शांतता आणि सुरक्षिततेसाठी परराष्ट्र धोरणचा वापर केला गेला पाहिजे, असे पंडित जवाहरलाल नेहरू यांचे ठाम मत होते.

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या या वरील विचारांवरून त्यांची वैचारिक प्रगल्भता लक्षात येते. केवळ देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला विकासाबरोबरच सुरक्षितता आणि शांततेकडे घेऊन जाण्याचा त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्यामुळेच पंडित जवाहरलाल नेहरूंच्या काळात भारताला



**प्रा. अंबादास नरसिंगराव पाचंगे**
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी,
श्री स्वामी समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रावळगाव,
ता. मालेगाव, जि. नाशिक.
७०५८१९२९६७
pachangeambadas@gmail.com

तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे नेता राष्ट्र म्हणून ते ओळखले जात असे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणाची मूलतत्त्वे खालीलप्रमाणे सांगता येतील.

● **विश्वशांतीला प्राधान्य:** पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विचारावर महात्मा गौतम बुद्ध ते महात्मा गांधी यांच्या शांती व अहिंसा आणि भारतीय संस्कृतीतील विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारित करतांना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी विश्वशांतीला प्राधान्य दिले आहे.

● **साम्राज्यवाद व वंशवादाला विरोध:** पंडित जवाहरलाल नेहरूयांच्या विचारांवर महात्मा गांधीजींच्या विचाराप्रमाणेच मानवतावादी विचारांवर विश्वास होता. तसेच त्यांनी देश विदेशातील साम्राज्यवादी व्यवस्थेखाली जीवन जगणाऱ्या नागरिकांचे जिने जवळून पाहिले होते, त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचे परराष्ट्र धोरण ठरविताना साम्राज्यवाद व वंशवादाला विरोध केला आहे,किंबहूना साम्राज्यवादी व वंशवादी विचारसरणी मानणाऱ्या देशापासून दूर राहण्याला प्राधान्य दिले आहे.

● **अलिप्ततावादाचा स्विकार:** दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये अमेरिका आणि रशिया या दोन परस्पर विरोधी विचारांच्या म्हणजेच भांडवलवादी अमेरिका तर साम्राज्यवादी रशिया आशा विचारांचे जागतिक राजकारणात दोन गट तयार झाले होते. तर दुसरीकडे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळामध्ये जागतिक पटलावर अनेक नवस्वातंत्र्य व सार्वभौम सत्ता प्राप्त राष्ट्रांचा उदय होत होता. अशाच काळात भारताला स्वातंत्र्य मिळाले.

अमेरिका व रशिया या सारख्या परस्पर विरोधी विचारांच्या देशांना स्वतःच्या गटामध्ये जास्तीत-जास्त राष्ट्रांना सामील करून घ्यावयाचे होते.परंतु अनेक नवस्वातंत्र्य प्राप्त राष्ट्रांना दोन्ही ही राष्ट्रांच्या गटात जाणे नको होते, तर काहींना दोन्ही ही महासत्ता राष्ट्रांच्या मदतीची गरज भासणार होती.

आशा वेळी जागतिक राजकारणाची जाण असलेल्या पंडित जवाहरलाल नेहरू यांनी कोणत्याही गटामध्ये सामील न होता, भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारित करताना अलिप्त राहण्याचे ठरवले होते. अलिप्ततेच्या धोरणाचा स्वीकार करताना, त्याविषयी पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की, आम्ही कुणाच्याही जवळ न जाण्याचा निर्णय घेत आहोत, कारण, कोणत्याही एका गटाकडे जाण्याच्या निर्णयाचा परिणाम इतिहासात विश्वयुद्धाच्या रूपाने पाहायला मिळाला आहे. त्यामुळे भारत कदाचित विश्वयुद्ध टाळण्यासाठी मोठी भूमिका निभावू शकतो. असे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अलिप्ततेच्या धोरणाचा स्वीकार करताना म्हणाले होते.

सुरुवातीला पंडित जवाहरलाल नेहरूंच्या या विचारावर टिका झाली असली तरीही त्यांचे हे धोरण एक यशस्वी धोरण व विचार म्हणून पाहिले जाते. त्यामुळे त्यांच्या परराष्ट्र धोरणाचे हे महत्त्वाचे मूलतत्त्व आहे.

● **पंचशील या तत्त्वांचा स्वीकार:** पंडित जवाहरलाल नेहरू यांची भारतीय तत्त्वज्ञानावरची पकड व अभ्यास खूप चांगला होता. जैन धर्म परंपरेमध्ये पंचतत्त्वांना महत्त्वाचे स्थान आहे.त्याच प्रमाणे बौद्ध धर्मामध्ये सुद्धा पंचशील या तत्त्वाला खूप महत्त्व आहे. या सर्वांतील एक चांगला परिपाक म्हणून भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारित करत असताना पंचशील या तत्त्वांचा स्वीकार पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केला आहे.

पंचशील या तत्त्वानुसार प्रत्येक राष्ट्रांनेएकमेकांच्या भौगोलिक एकात्मता आणि सर्वभौमत्वाचा आदर करणे, युद्ध आणि आक्रमनास विरोध, समानता आणि परस्पर हिताला प्राधान्य दिले, शांततापूर्ण सहजीवनाचा अवलंब करून इतर राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेपाला विरोध करण्यात आला आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारण करत असताना स्वीकारलेल्या या पंचशील तत्त्वामुळे भारताची जगामध्ये एक शांतता प्रिय व अहिंसक राष्ट्र म्हणून आजही ख्याती कायम आहे. याचे सर्व श्रेय पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रगल्भ विचारांना जाते.

● **सहकार्य व शांततामय सहजीवनास प्राधान्य:** पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारित करत असताना अलिप्ततेच्या तत्त्वांचा स्वीकार केलेला असला तरीही जागतिक शांतता, अहिंसा व याचबरोबर एकमेकांच्या देशांच्या सार्वभौमत्वाचा आदर करून तेथील जनतेच्या व त्या - त्या राष्ट्रांच्या विकासासाठी प्राधान्य देणाऱ्या धोरणाचा स्वीकार केलेला आहे.

त्यामुळे जगामध्ये राष्ट्रा-राष्ट्रामध्ये शांतता व मित्रत्वाची भावना वाढीस लागून मानवतावादास चालना मिळाली, याचे सर्व श्रेय पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या परराष्ट्र धोरण निर्धारण क्षमतेला द्यावे लागते. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या या मानवतावादी परराष्ट्र धोरण विषयक विचारांमुळेच आजही जगामध्ये त्यांची ओळख आदर्शवादी व मानवतावादी म्हणून कायम आहे.

भारताच्या सर्वांगीण विकासासाठी भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारित करत असताना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी शांती, अहिंसा, एकमेकांच्या स्वातंत्र्याचा आदरभाव, एकमेकांच्या राष्ट्रहितला प्राधान्य देत, राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला, आदर्शवादाला व नैतिकतेला प्राधान्य दिले. तर साम्राज्यवाद, वंशवाद, आक्रमक व हिंसात्मक विकास यासारख्या गोष्टींना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचे परराष्ट्र धोरण ठरवताना विरोध केला आहे.

तसेच त्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारित करताना, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी कोणत्याही महासत्तांच्या गटात सामील न होता, अलिप्ततेच्या धोरणाचा पुरस्कार केला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या या धोरणाचे पुढे सर्वत्र कौतुक झाले आहे. तसेच भारतास तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे नेतेपद ही मिळाले आहे.

थोडक्यात, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारित करत असताना आदर्शवाद व नैतिक मूल्यांचा स्वीकार करत राष्ट्र हिताला अधिकाधिक प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच पंडित जवाहरलाल नेहरू यांना भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते.

---

# कार्यकर्त्यांचे भविष्य?




साहेबांचे आवाहन ऐकून पेटलेल्या बंड्याने मोर्चात जाण्यासाठी बॉसकडे सुट्टीसाठी अर्ज केला. बॉसने कामाची गरज लक्षात घेता सुट्टी द्यायला नकार दिला. इथे संतापलेल्या बंड्याला साहेबांचे शब्द पुन्हा आठवले आणि त्याने बॉसला मारला.

मग बॉसने बंड्याविरोधात पोलिस तक्रार केली. पोलिसांनी बंड्याला अटक केली. कंपनीने बंड्यावर कडक कारवाई केली आणि त्याला बडतर्फ केला. ऑफिसमधले सीसीटीव्ही आणि साक्षीदार यांच्या आधारे बंड्या विरोधातील गुन्हा सिद्ध झाला आणि बंड्याला शिक्षा झाली.

कोर्ट आणि पोलिस स्टेशनच्या खेपा मारायला त्याच्या पक्षाचा एकही नेता किंवा मित्र आला नाही कारण ते मोर्चात आणि मग महापालिका निवडणुकीत व्यस्त होते. त्याचे वृद्ध आई वडील मात्र पदरमोड करून बस आणि ट्रेनचे धक्के खात हजर रहायचे. शेवटच्या दिवशी जेव्हा त्याला शिक्षा सुनावली गेली तेव्हा हताश होऊन दोघे गेले ते परत दिसले नाहीत. अखेर काही महिन्यांनी शिक्षा भोगून बंड्या बाहेर आला.

बाहेर आल्यावर घरी जायच्या आधी पक्षाच्या कार्यालयात गेला. त्याच्या शिवायही मोर्चा अतिशय यशस्वीपणे पार पडला होता. पक्षाचा एकही कार्यक्रम थांबला नव्हता. निवडणूकही नीट झाली. या सगळ्याचे फोटो बघून तो भरवून गेला.

तशाच भारावलेल्या अवस्थेत तो घरी पोहोचला. दार वाजवले तर भलतंच कोणीतरी दारा उघडले. त्याचे कुटुंब तिथे नव्हते. घरातला एकमेव कमावता माणूस तुरुंगात शिक्षा भोगत असल्याने बंड्याच्या आई वडिलांवर बिकट परिस्थिती उद्भवली होती. राहत्या घराचे भाडे भरायला पैसे नसल्याने त्याच्या कुटुंबाला घरमालकाने बाहेर काढले आणि त्यांना पुन्हा गावाला स्थलांतरित व्हावे लागले.

नोकरीच्या ठिकाणी बंड्याला काढल्यानंतरही कंपनीचे काहीही अडले नाही. त्याच्या जागी एका बिहारी तरुणाला नोकरीवर ठेवले. जो अतिशय मेहनतीने काम करत होता. कंपनीचे नियम आणि शिस्त पाळत होता. एखाद्या राजकीय मोचार्साठी सुट्टी मागत नव्हता आणि बॉसला मारहाणही करत नव्हता.

ही परिस्थिती पाहून बंड्याचे डोके चक्रावले होते. पण आत्ता त्याच्यासाठी सगळ्यात महत्वाचे होते नवीन नोकरी पदरात पाडणे. त्यामुळे तो जागोजागी इंटरव्ह्यू देत नोकरीच्या प्रयत्नात होता. पण आधीच्या कंपनीतून बडतर्फ केल्यामुळे त्याच्याकडे रिलिव्हिंग लेटर ऐवजी टर्मिनेशन लेटर होते, त्यात पोलिस रेकॉर्डवर नाव आल्यामुळे जेव्हा त्याची पार्श्वभूमी तपासली जायची तेव्हा कोणतीही कंपनी त्याला नोकरीवर ठेवून घ्यायला तयार नव्हती.

शेवटी हतबल होऊन कंटाळलेल्या बंड्याने पक्षाच्या स्थानिक नेत्यांसमोर आपले गाऱ्हाणे मांडले. त्याची कथा ऐकून सगळ्यांचाच पारा चढला. त्याला न्याय मिळवून द्यायचे वचन देत ते त्याला मोठ्या साहेबांकडे घेऊन गेले. आपले दैवत असलेल्या साहेबाचा आलिशान बंगला म्हणजे बंड्यासाठी मंदिरच होते.

त्याची भव्यता पाहून त्याने आ वासला. साहेबांच्या घरातील कुत्र्यांची खोली ही बंड्याच्या संपूर्ण घरापेक्षा मोठी आणि प्रशस्त होती. या मंदिरात आपल्याला न्याय नक्की मिळणार या आशेने बंड्या साहेबांची वाट बघत उभा होता. थोड्या वेळाने साहेब आले. त्यांनी बंड्याचे म्हणणे ऐकले. आपल्या पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यावर आलेली ही परिस्थित पाहून साहेब फारच संतापले. त्यांचा चेहरा रागाने लाल झाला.

त्याच्या खांद्यावर हात टाकून 'या माझ्या सैनिकाला मी न्याय मिळवून देणारच' असा प्रण त्यांनी केला. साहेबांच्या या शब्दांनी बंड्याला धीर आला. आपल्याला आता नोकरी मिळणार, भाड्याचं का होईना पण मुंबईतील घर पुन्हा मिळणार, आई बाबांना ताठ मानेने पुन्हा मुंबईत आणायची योजना ते करू लागला, एका चांगल्या मुलीशी लग्न करून सुखी संसाराची स्वप्न बघू लागला.

इतक्यात साहेबांनी दिलेल्या तातडीच्या आदेशाने तो भानावर आला. साहेबांनी पत्रकार परिषद बोलवली होती. बंड्याला घेऊन ते पत्रकार परिषदेत बसले. पत्रकारांसमोर साहेबांनी आपल्या पल्लेदार भाषेत बोलायला सुरुवात केली. बंड्याला पुढे करत त्यांनी महाराष्ट्रातल्या रोजगाराच्या स्थितीवर प्रश्न उपस्थित केले. बाहेरची माणसं मराठी मुलांच्या नोकऱ्या पळवत आहेत आणि नोकरदारवर्ग मराठी मुलांच्या जागी परप्रांतियांना प्राधान्य देत असल्याचा सनसनाटी आरोप त्यांनी केला.

ही परिस्थिती आपण बदलणारच असं त्यांनी सांगितलं आणि त्यासाठी नव्या मोर्चाची घोषणा केली. या मोर्चात बंड्या साहेबांच्या सोबत चालेल असेही त्यांनी जाहीर केले. इतर तरुणांनी सुट्टी घेऊन या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले आणि सुट्टी न मिळाल्यास बॉसला मारा असा सल्लाही दिला.

■ ■ ■

---

## वाचक लिहितात

### अत्यंत प्रेरणादायी लेख

आमचं अस्तित्व आमच्या प्रतिभेवर उभं... हा प्रवीण बागडे यांचा लेख अत्यंत प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक आहे. या लेखातून त्यांनी स्त्रियांच्या आत्मविश्वासाचा, परिश्रमाचा आणि सामाजिक अस्तित्वाचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. क्रीडा क्षेत्रात भारतीय महिला खेळाडूंनी केलेली उल्लेखनीय कामगिरी ही फक्त विजयाची नव्हे, तर समानतेच्या आणि सशक्तीकरणाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे, हे लेखकाने नेमक्या शब्दांत मांडले आहे. लेखातील विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीला, विशेषतः तरुणाईला, आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याची प्रेरणा देतात. डॉ. आंबेडकरांच्या समतेच्या आणि संविधानिक मूल्यांच्या संदभार्ने केलेले विश्लेषण लेखाला बौद्धिक आणि नैतिक खोली प्रदान करते. समाजातील महिलांच्या यशाकडे फक्त क्रीडाविजय म्हणून नव्हे तर सामाजिक क्रांतीच्या दृष्टीने पाहण्याचा दृष्टीकोन लेखकाने दिला आहे.

प्रवीण बागडे यांचे लेखन सुसंस्कृत विचारांचे, भावनाप्रधान अभिव्यक्तीचे आणि सकारात्मकतेने भारलेले आहे. अशा लेखनामुळे समाजात स्त्री-पुरुष समानतेची जाणीव दृढ होते आणि नवी पिढी आत्मविश्वासाने पुढे जाण्याची प्रेरणा घेते.

■ प्रमोद जांभूळकर, नागपूर.

### नेत्यांनी सावध व्हावे..

काही महिन्यांपूर्वी नेपाळमध्ये झालेल्या उद्रेकाचे कारण काहीही असू देत. परंतु, भारतात आणि महाराष्ट्रातही बेरोजगार तरूणांमध्ये राज्यकर्त्यांविरोधात संताप वाढू लागला आहे. शिक्षण घेवूनही हाताला काम नाही, बेरोजगार गुन्हेगारीकडे वळत आहेत. शासनाने फुकटच्या योजना राबविण्यापेक्षा तरूणांच्या हाताला काम मिळेल, असे काही करावे. अन्यथा नेत्यांना महागात पडेल.

■ सुरेश कठाणे, नागपूर.

---

# नितीशकुमारांचा आधार : महिला व्होटबँक



मुंबई कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

बिहारच्या विधानसभा निवडणुकीकडे सर्व देशाचे लक्ष लागले आहे. मतदानाच्या पहिल्या टप्प्यात नेहमीपेक्षा मतदान जास्त झाल्याने त्याचा लाभ कुणाला होणार याविषयी वेगवेगळे अंदाज बांधले जात आहेत. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाने मतदारांना आकर्षित केले आहे.

त्यांनी अनेक सुशिक्षित नवे चेहरे उमेदवार म्हणून उतरवले आहेत. त्यांच्या सभांना शहरी भागात मोठा प्रतिसाद लाभल्याने ते निवडणुकीत किती मते मिळवतात व त्याचा भाजपाच्या व्होट बँकेवर किती परिणाम होऊ शकतो, त्यावर सत्ता स्थापनेची समीकरणे बदलू शकतात.

छट पुजा उत्सवानंतर लगेचच मतदान झाल्यामुळे परप्रांतातून आलेले मतदार राज्यात थांबले व त्यामुळेही मतदानाची आकडेवारी वाढली असे सांगण्यात येते. सर्वात महत्वाचे म्हणजे मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत राज्यातील दिड कोटी महिलांच्या बँक खात्यात निवडणुकीच्या तोंडावर नितीशकुमार यांच्या सरकारने थेट दहा हजार रुपए जमा केल्यामुळे महिला अतिशय आनंदी आहेत.

महिला मतदारांचे भरघोस मतदान एनडीएच्या उमेदवारांना मिळेल, असा विश्वास नितिशकुमार यांच्या जनता दल युनायटेड पक्षाला व भाजपाला वाटतो आहे. तब्बल वीस वर्षे मुख्यमंत्री पदावर असलेल्या नितीश कुमार यांना पुन्हा सत्ता मिळविण्यासाठी महिलांसाठी दस हजारी योजना राबवावी लागली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यापुर्वी विरोधी पक्षांच्या राज्यात निवडणुकीच्या तोंडावर दिल्या जाणाऱ्या सवलतींवर सडकून टीका केली होती. त्यांनी अनेकदा रेवडी संस्कृतीची खिल्ली उडवली. पण मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि हरयाणात तेथील भाजपा सरकारने राबवलेल्या लाडकी बहिण योजनेने भाजपाला पुन्हा सत्ता मिळवून दिल्यापासून मोदींनी रेवडी वाटपावर टीका करणे बंद केले आहे. भाजपाने या तीन राज्यात रेवड्या वाटून सत्ता मिळवली तसेच नितीशकुमार यांनी बिहारमधे निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री महिला रोजगार योजना जाहीर केली.

महिलांना स्वयंरोजगार व उद्योग सुरू करण्यासाठी ही योजना आहे. त्याची सुरूवात म्हणून दिड कोटी महिलांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपए सरकारने जमा केले आहेत. राज्यातील कायम निवासी तसेच १८ ते ६० वयोगटातील महिलांसाठी ही योजना आहे, त्यांनी आपला रोजगार, उद्योगाचा आराखडा सादर केल्यावर सहा महिन्यात आणखी दोन लाख रुपए त्यांना देण्यात येणार आहेत.

महाराष्ट्राप्रमाणे लाडकी बहिण योजना सरसकट सर्व महिलांसाठी लागू केलेली नाही. नितीशकुमार हे पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा २००६ मधे त्यांनी महिलांसाठी सायकल योजना सुरू केली. त्याचाही त्यांना लाभ झाला. महिला व्होट बँकेसाठी सायकल ते दस हजारी असे त्यांच्या कारकिर्दीचे वर्णन केले जात आहे. नितीशकुमार यांनी राज्यात दारूबंदी जाहिर केली. त्याचे महिलांनी जोरदार स्वागत केले. त्याचाही लाभ नितीशकुमार यांना निवडणुकीत होईल. महिला व्होट बँक हा नितीशकुमार यांचा मोठा आधार आहे.

हरयाणात महिलांना दरमहा २१०० रुपए व बेरोजगारांना दरमहा १२०० ते ३५०० रुपए देण्याचे भाजपाने निवडणुकीत आश्वासन दिले होते. महाराष्ट्रात लाडकी बहिण योजनेखाली दरमहा १५०० रुपए दिले जातात. निवडणुकीत मतदारांना विकास कामांपेक्षा थेट रेवड्या महत्वाच्या वाटतात हेच महाराष्ट्र, मध्य प्रदेश व हरयाणाने दाखवून दिले आहे.

बिहारमधे राजदने सत्तेवर आल्यास महिलांना दरमहा अडिच हजार रुपए देऊ असे आश्वासन दिले आहे. अतिमागास कुटुंबातील एकाला सरकारी नोकरी देण्याचेही आश्वासन दिले आहे.

नितीशकुमार यांच्यावर राम मनोहर लोहिया व जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचा प्रभाव आहे. पण त्यांनी सत्तेसाठी काँग्रेस, राजद व भाजपा अशी अलटून पालटून युती केली आहे. बिहार विधानसभा निवडणुकीची मतमोजणी चौदा नोव्हेंबरला आहे, एनडीए सत्तेवर आली पुन्हा नितीशकुमारच मुख्यमंत्री होतील की भाजपा आपल्याकडे मुख्यमंत्रीपद घेईल हे ठामपणे सांगता येत नाही.

एनडीएचा निवडणूक जाहीरनामा घोषीत झाला तेव्हा स्वतः नितीशकुमार हजर होते पण पण केवळ तीस सेकंदात पत्रकार परिषद संपली व सर्व नेते उठून गेले. एनडीएचा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार कोण हा प्रश्न विचारला जाईल अशी त्यांना खात्री होती, त्याचे उत्तर टाळण्यासाठी प्रश्नोत्तरे न होताच पत्रकार परिषद संपवली गेली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना काही दिवसापूर्वी पत्रकारांनी मुख्यमंत्री कोण होणार असा प्रश्न विचारला तेव्हा त्यांनी निवडून येणारे आमदार ठरवतील असे उत्तर दिले होते. नितीशकुमार यांना त्यांचे उत्तर आवडले नसावे. मोदी यांच्या पहिल्या सभेला नितीशकुमार उपस्थित राहिले .

मोदींच्या नंतर राज्यात डझनभर सभा व रोड शो झाले, भाजपाच्या अनेक बड्या नेत्यांचे प्रचार दौरे झाले पण नितीशकुमार तिकडे फिरकले नाहीत.

गेल्या सतरा निवडणुकांमधे पाच टक्के मतदान वाढले किंवा कमी झाले तर सत्ता परिवर्तन होते, हा बिहारचा अनुभव आहे. १९९० मधे काँग्रेसची राजवट संपली तर २००५ मधे लालू झ्र राबडी राज संपुष्टात आले. नितीशकुमार गेली वीस वर्षे मुख्यमंत्री आहेत. त्यांचे वय झाले आहे, तब्येतही नरम असते. त्यांनी आपल्या पक्षाचा वारस किंवा नंबर दोन कोण आहे हे जाहीर केलेले नाही.

नितीशकुमार पुन्हा मजबुतीने विजयी होतील असे अनेकांना वाटते. पण तेजस्वी यादव पराभूत झाले तर महाआघाडीला नवा नेता शोधावा लागेल. मतदारांनी चूक केली तर बिहारमधे पुन्हा जंगलराज येईल असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रत्येक सभेतून दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपाच्या राज्यातील प्रमुख नेत्यांनी बिहारमधे प्रचारात हजेरी लावली आहे. भाजपाने सर्व राज्यातून शेकडो नेते व हजारो कार्यकर्त्यांची फौज गेले महिनाभर बिहारमधे तैतान ठेवली आहे. राज्यात सवर्ण मतदारांची संख्या दहा टक्के आहे. पण त्या आधारावर भाजपा सत्तेपर्यंत पोचू शकत नाही. म्हणूनच नितीशकुमार यांची मदत घेतल्याशिवाय भाजपा पाटण्याची सत्ता काबीज करू शकत नाही असे अनेकांना वाटते.

उत्तर भारतात बिहार हे एकमेव हिंदी भाषक राज्य आहे की तिथे भाजपाला आपला मुख्यमंत्री आजवर बसवता आलेला नाही. चौदा तारखेच्या मतमोजणीनंतर काय चमत्कार घडतो त्यावर बिहारचा नवा मुख्यमंत्री कोण हे ठरणार आहे.

---

# गहू, ज्वारी की बाजरी आरोग्यासाठी कोणते जास्त फायदेशीर आहे?



जवळजवळ प्रत्येक घरात गव्हाची चपाती, रोटी किंवा फुलके खाल्ले जातात. तर काही घरांमध्ये काहीजण ज्वारीच्या भाकरी किंवा बाजरीच्या भाकरी खातात. या रोट्यांचे, भाकऱ्यांचे आरोग्यासाठी अनोखे फायदे आहेत.

यामुळे प्रश्न निर्माण होतो की या तिन्हीपैकी कोणती चपाती किंवा भाकरी आरोग्यासाठी सर्वात फायदेशीर असते.शरीरासाठी गहू, ज्वारी कि बाजरी नक्की काय फायदेशीर आणि आरोग्यदायी असतं? जाणून घेऊयात.

**गव्हाची चपाती**

गव्हाची चपाती, रोटी किंवा फुलके ही साधारणपणे प्रत्येक घरात खाल्ली जाते. गव्हाच्या चपात्यांमध्ये काबोर्हायड्रेट्स, प्रथिने, फायबर आणि व्हिटॅमिन बी सारखे पोषक घटक असतात, जे आरोग्याला फायदेच देतात.

गव्हाची चपाती शरीराला ऊर्जा प्रदान करते. पण ही गव्हाची चपाती आरोग्यासाठी जेवढी फायदेशीर असते तेवढीच ती काहींसाठी नुकसानकारकही असते. जसं की, ग्लूटेन इनटॉलरेंस, गॅस किंवा पोटाच्या समस्या असलेल्या लोकांनी गव्हाची चपाती खाणे टाळले पाहिजे. यामुळे गॅस आणि बद्धकोष्ठता होऊ शकते.

**ज्वारीची भाकरी**

अनेक घरात ज्वारीची भाकरी अतिशय आवडीने खाल्ली जाते. ज्वारी ग्लूटेन-मुक्त असते आणि आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. त्यात फायबर, लोह, कॅल्शियम आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे सर्व आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जातात. मधुमेहींसाठी त्याचे सेवन विशेषतः फायदेशीर मानले जाते. हे फायबरचा एक उत्कृष्ट स्त्रोत देखील आहे, जे तुम्हाला जास्त काळ पोट भरलेले ठेवण्यास मदत करते. त्यामुळे वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. तसेच वजन कमी करण्यास मदत करते.

**बाजरीची भाकरी**

हिवाळ्याच्या काळात बाजरीचे सेवन आरोग्यासाठी विशेषतः फायदेशीर मानले जाते. मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम आणि फायबर सारख्या पोषक तत्वांनी समृद्ध असलेली बाजरी हृदय आणि हाडांसाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. त्याचे सेवन केल्याने हाडे मजबूत होतात आणि स्ट्रोकचा धोकाही कमी होतो.

त्यामुळे ज्यांना पोटाचे आजार आहे त्यांनी तर गव्हाची चपाती, रोटी नक्कीच खाण्याचं प्रमाण कमी ठेवले पाहिजे किंवा टाळले पाहिजे. तसेच त्यांनी डॉक्टरांचा सल्लाही घेतला पाहिजे.

■ ■ ■

---

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### पक्षी सप्ताह ..!

अनेकविध वैशिष्ठयांचे
विविध पक्षी भुतलावर
विहरतांना दिसती ..

त्यांचे निरीक्षण करता
दृष्टीस येती आश्चर्यकारक
मनोरंजक गमती जमती ..

त्यांना नाही मानवासारखी हाव
पोटाला लागते तेवढेच ते
निसर्गाकडून चोचीत घेती ..

मानव फारच स्वार्थी
घरटेही बांधू देईना अंगणी
बिचाऱ्यांना निवाऱ्यासाठी ..

# डमी उमेदवार ठरविणार 'भावी नगराध्यक्ष'च्या विजयाचे भविष्य!



## चांदूर बाजार-अचलपूर नगर परिषद निवडणूक होणार रंगतदार

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,( दि.11 )-** चांदूर बाजार आणि अचलपूर नगर परिषद निवडणुकीत यंदा डमी उमेदवार हा निकाल ठरवणारा घटक ठरण्याची शक्यता आहे. पक्षांतर्गत गटबाजी, युतीतील मतभेद आणि स्थानिक नेत्यांतील संघर्षामुळे निवडणूक अधिकच रंगतदार झाली आहे.

नगराध्यक्षपदाच्या स्पर्धेत काही उमेदवार केवळ मतविभाजनासाठी उतरवले जात असल्याचे बोलले जात आहे. या डमी उमेदवारांमुळे मुख्य उमेदवारांचे मत कमी होऊन विजय-पराजयावर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढला असून, नेत्याला फायदा पण कार्यकर्त्याचा बळी असे समीकरण दिसू लागले आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर चांदूर बाजारङ्घअचलपूर परिसरातील राजकीय समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलली आहेत. प्रहारचे बच्चू कडू आणि भाजपचे आमदार प्रवीण तायडे यांच्या गटांमध्ये अप्रत्यक्ष संघर्ष सुरू असून, दोन्ही गट नगर परिषद निवडणुकीत वर्चस्व मिळविण्याच्या तयारीत आहेत. काँग्रेसही पुन्हा पाय रोवण्यासाठी सज्ज झाली आहे, त्यामुळे तिहेरी लढत निश्चित मानली जाते. युतीच्या चर्चांमुळे काही इच्छुकांना उमेदवारीसाठी प्रतीक्षा करावी लागत असून, नाराज कार्यकर्ते स्वतंत्र उमेदवारीच्या तयारीत आहेत. यामुळे डमी उमेदवारांची संख्या वाढण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, या निवडणुकीत गुप्त युती, समझोते आणि डमी उमेदवारांची तैनाती हेच निर्णायक ठरणार आहेत. आगामी काही दिवसांत नामांकन प्रक्रियेसह ही समीकरणे स्पष्ट होतील. एकूणच चांदूर बाजार आणि अचलपूरची निवडणूक यंदा अधिकच तापलेली आहे.

# शिवसैनिकांच्या पक्षप्रवेशाने भाजपमध्ये नाराजीचा सूर?



### शिवसेना ( उबाठा )ची शक्ती कायम

### कार्यकर्त्यांचा ठाम आत्मविश्वास

प्रविण बोके

**अंजनगाव सुर्जी,( दि.11 )-** शिवसेना (उबाठा)मधील एका गटाने भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याने सेनेच्या शक्तीत कोणताही फरक पडणार नसल्याचे बोलले जात आहे. मात्र, या प्रवेशामुळे भाजपमध्येच अंतर्गत कलह निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नगरपरिषद अंजनगाव सुर्जी निवडणुकीची रणधुमाळी सुरू होताच इच्छुक उमेदवारांमधील हालचालींना वेग आला आहे. आपल्याला या पक्षातून उमेदवारी मिळेल का? मिळाली तर निवडून येता येईल का? मग कोणत्या पक्षात प्रवेश करावा? अशा प्रश्नांमुळे इच्छुकांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. परिणामी, शहरात एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाण्याची लगबग दिसून येत आहे. दि. 8 नोव्हेंबर रोजी अंजनगाव सुर्जी येथे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शिवसेना (उबाठा)मधील प्रविण नेमाडे यांच्या नेतृत्वाखालील गटाने भाजपमध्ये प्रवेश केला. यात माजी नगराध्यक्ष, काही माजी नगरसेवक आणि शिवसेनेचे पदाधिकारी सहभागी होते. या घडामोडीमुळे शहरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. काहीजणांच्या मते, सेनेला खिंडार पडले असले तरी हे आधीपासूनच अपेक्षित होते. आंतरिक असंतोष आणि आगामी निवडणुकांतील अस्तित्व टिकवण्यासाठी केलेली धडपड याला कारणीभूत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

#### आरक्षणाने बिघडविले गणित

प्रविण नेमाडे यांचे वडील देविदास नेमाडे यांनी पूर्वीच भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्या वेळी नगराध्यक्षपदाचे आरक्षण त्यांच्या विरोधात गेल्याने गणित बिघडले होते, मात्र उपाध्यक्ष पद मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केल्याचे बोलले जाते. भाजपमध्ये नव्या कार्यकर्त्यांचा ओघ वाढत असताना, जुन्या कार्यकर्त्यांवर अन्याय झाल्यास 'आउटगोइंग' ही सुरू होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे शिवसेनेवर विशेष परिणाम होणार नसला, तरी सेनेतून भाजपात आणि भाजपातून सेनेत जाणाऱ्या इच्छुकांना मतदार स्वीकारतील का?, हा मोठा प्रश्न आहे.एकूणच, शहराच्या विकासाच्या मुद्यांपेक्षा पक्षप्रवेशाच्या हालचालींनाच सध्या अधिक महत्त्व मिळत आहे. पुढील काही दिवसांत राजकीय कोलांटउड्या आणि मतदारांचा प्रतिसाद हेच अंजनगाव सुर्जीतील राजकारणाचे चित्र ठरवतील.

## 50 हजार शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले

**पाणी फाउंडेशनच्या 'फार्मर कप'उपक्रम**

**अमरावती,( दि.11 )** – सन 2022 पासून पाणी फाउंडेशनने सत्यमेव जयते फार्मर कप या उपक्रमाद्वारे संघटन आणि ज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे कार्य सुरू केले आहे. या उपक्रमाचा लाभ राज्यातील 50 हजारांहून अधिक शेतकऱ्यांना झाला असून, त्यातील निम्म्या संस्था महिला शेतकऱ्यांच्या आहेत. त्यामुळे हा उपक्रम महिला सशक्तीकरणासाठीही प्रभावी ठरला आहे. या उपक्रमाचा उद्देश केवळ जलसंधारणापुरता मर्यादित नसून, शेतकऱ्यांना आधुनिक शेतीत आत्मनिर्भर बनविणे हा आहे. राज्यभर जनजागृती करून शेतीतील संघटनेसाठी जनचळवळ उभी करण्याचे आवाहन पाणी फाउंडेशनकडून करण्यात येत आहे. या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कृषी चिकित्सालय, येरला (मोर्शी) येथे मोर्शी आणि तिवसा तालुक्यांसाठी, तर तहसील कार्यालय सभागृह अमरावती व नांदगाव खंडेश्वर येथे अनुक्रमे 1 आणि 3 नोव्हेंबर रोजी प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी 'फार्मर कप'चे उद्दिष्ट, शाश्वत जलव्यवस्थापन, गट शेती, पाणी बचत आणि शेतकरी संघटनाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. कर्मचारी वर्गाने उत्साहाने सहभाग नोंदविला.

# भव्य शंकर पटाचा उद्घाटन सोहळा

### स्व. रतनलालजी भुतडा स्मृती प्रित्यर्थ आयोजन



महासागर | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, ( दि.11 )–** मंगरुळ दस्तगीर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही स्व. रतनलालजी भुतडा स्मृती प्रित्यर्थ आयोजित भव्य शंकर पट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे खासदार अमर काळे आणि अध्यक्षस्थानी आमदार प्रताप अडसड यांच्या उपस्थितीत सोहळा पार पडला. या वेळी दोन्ही मान्यवरांनी पारंपरिक क्रीडा संस्कृती जपल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे नियोजन रवि भुतडा व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. यावेळी सरपंच सतीश हजारे, विजय उगले, रामदास निस्ताने, मंगेश काळे, राजू धारवाले, राहुल ठाकरे, प्रमोद गुल्हाने, पवन पडोळे आदी मान्यवर उपस्थित होते. शंकर पट समितीचे अध्यक्ष रवि भुतडा, उपाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव अनुप महल्ले आदींच्या नेतृत्वात कार्यक्रम पार पडला. पहिल्या दिवसाच्या सामन्यांत सागर काळे (शिव मल्हार) व दत्तात्रय खेळकर (कन्हैया शुक्रा) यांनी अनुक्रमे पहिला आणि दुसरा क्रमांक पटकावला.

रवि भुतडा यांनी सांगितले की, शंकर पट हा गावाचा सन्मान असून ग्रामीण क्रीडा संस्कृती जिवंत ठेवणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. गावकऱ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे मंगरुळ दस्तगीर येथे शंकर पटाचा उत्सव अधिकच रंगतदार झाला.

# बोगस डॉक्टरांवर पोलिसांच्या समन्वयाने कारवाई करा!

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर

### दैनिक महासागर ने प्रकाशित केली होती बोगस डॉक्टरांची बातमी



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.11 )-** बोगस डॉक्टरांच्या संदर्भात आलेल्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी. याबाबत सखोल तपासासाठी आरोग्य यंत्रणांकडे आलेल्या तक्रारी पोलिसांनाही देण्यात याव्यात. यामुळे भविष्यातही कारवाई करता येईल, असे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सांगितले. दैनिक महासागर ने 12 सप्टेंबर रोजी 'चांदूर बाजार तालुक्यात झोलाछाप बंगाली डॉक्टरांची बजबजपुरी' या मथळ्याखाली बातमी प्रकाशित केली होती.



तालुक्यात झोलाछाप बंगाली डॉक्टरांची बजबजपुरी

मेळघाटनंतर तालुक्याचा नंबर

जिल्हा समितीकडून कारवाई

महासागर प्रतिनिधी

चांदूर बाजार,( दि.11 )-

जिल्हाधिकारी कार्यालयात आज बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याकरीता जिल्हास्तरीय समिततीची सभा पार पडली. यावेळी पोलिस उपअधिक्षक राजेश भुयार, पोलिस निरीक्षक सिमा दाताळकर, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, डॉ. विजय अजमिरे, पवन टेकाळे, डॉ. अनिल माणिकराव आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, नागरिकांच्या तक्रारीसोबतच प्रसारमाध्यमांमधील आलेल्या बातम्यांनुसार बोगस डॉक्टरांवर कारवाई करावी. ही कारवाई करताना पोलिस विभागाला याची माहिती देण्यात यावी. पोलिसांना माहिती दिल्यास नंतरच्या काळात इतरत्र व्यवसाय करीत असल्याची माहिती मिळण्यास मदत होईल. जिल्ह्यात प्रामुख्याने चांदूरबाजार परिसरात बोगस डॉक्टरांच्या तक्रारी अधिक प्रमाणात येत आहे. त्यामुळे या भागात लक्ष देण्यात यावे. पोलिस आणि आरोग्य विभागाकडे आलेल्या तक्रारीवर तातडीने कारवाई करावी.

कारवाई करताना पोलिसांचे सहकार्य घ्यावे. जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचे प्रमाण कमी असले तरी आलेल्या तक्रारीवर कारवाई होणे आवश्यक आहे. यामुळे भविष्यात होणारा अपघात टाळल्या जाऊ शकेल. नागरिकांनीही परिसरात बोगस डॉक्टर व्यवसाय करीत असल्याचे आढळल्यास तातडीने पोलिस आणि आरोग्य विभागाकडे माहिती द्यावी, असे आवाहन येरेकर यांनी केले.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी 'एल्डर लाईन'सेवा उपयुक्त

**अमरावती, ( दि. 11 ) –** सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार तसेच राज्य सरकारच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी 'एल्डर लाईन 14567' ही राष्ट्रीय हेल्पलाईन सेवा देशभर सुरू करण्यात आली आहे. वयोवृद्धांच्या अडचणी, वेदना आणि तक्रारी ऐकून त्यांना मदत मिळवून देण्यासाठी ही सेवा कार्यरत आहे. महाराष्ट्रात ही सेवा जनसेवा फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून चालविली जाते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विनोद शहा यांच्या मार्गदर्शनाखाली गेली 37 वर्षे संस्था गरीब, आजारी, वृद्ध, अपंग आणि निराधारांसाठी कार्यरत आहे. ऑगस्ट 2021 पासून सुरू झालेल्या या हेल्पलाईनवर राज्यभरातून आतापर्यंत 4 लाखांहून अधिक कॉल्स प्राप्त झाले असून, 30 हजारांहून अधिक ज्येष्ठांना प्रत्यक्ष मदत मिळाली आहे. या हेल्पलाईनद्वारे आरोग्य, निवारा, कायदेशीर सल्ला, पेन्शन योजना, मानसिक आधार, तसेच अत्याचारग्रस्त किंवा बेघर वृद्धांसाठी पुनर्वसन आणि समुपदेशन यांसारख्या मोफत सेवा पुरवल्या जातात.

### शहरात कलम 37 ( 1 ) व ( 3 ) लागू

**अमरावती** – शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्त (अमरावती शहर) यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम 37 (1) व (3) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. सदर प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून दि. 13 नोव्हेंबर ते 27 नोव्हेंबर 2025 च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# तिन्ही नगरपालिका आमच्या करा!

## विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही — पालकमंत्री




महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि.11 )–** वरुड–मोर्शी विधानसभेतील विकासकामांना गती देण्यासाठी वरुड, मोर्शी, शेंदुरजना घाट या तीनही नगरपालिकांवर सत्ता आणा, निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. आगामी नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते.

कार्यक्रमास राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार चंदू यावलकर, भाजप जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, उपाध्यक्ष श्रीधर सोलव, प्रभाकर काळे व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. बावनकुळे म्हणाले, वरुड– मोर्शी विधानसभा ही विकासाच्या दृष्टीने प्राधान्यक्रमावर आहे. आमदार चंदू यावलकर यांच्या प्रयत्नांना मी नेहमी साथ देईन. मात्र नगरपालिका आपल्या हाती आल्यास विकासाचा वेग दुपटीने वाढेल.

बावनकुळे पुढे म्हणाले, निवडून दिलेल्या प्रतिनिधींना प्रशासनाशी लढून विकास साधावा लागतो. पण सर्व नगरपालिका आमच्या झाल्या, तर नियोजन जलद होईल आणि प्रकल्प वेळेवर पूर्ण होतील. कार्यकर्त्यांमध्ये निवडणुकीबाबत उत्साह असून, विकासावर आधारित संदेश नागरिकांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला.

आमदार यावलकर यांनी मागील अकरा महिन्यांत रस्ते, पाणीपुरवठा, सिंचन, आरोग्य सुविधा आदी अनेक प्रकल्प मंजूर केल्याचे सांगण्यात आले. तसेच नागरिकांच्या मागण्यांनुसार आठवडी बाजार, सावता मंदिर जिर्णोद्धार, सांडपाणी प्रकल्प व शहर सौंदर्यीकरणाची कामे करण्याची ग्वाही दिली.

# सोमवारी 'युनिटी वॉक'चे आयोजन

### युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.11 )–** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150व्या जयंतीनिमित्त अमरावती जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार सोमवार, दि. 17 नोव्हेंबर रोजी सकाळी 7 वाजता 'युनिटी वॉक'चे आयोजन करण्यात आले असून, युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पदयात्रेला विमलाबाई देशमुख सभागृहातून सुरुवात होऊन ती पंचवटी चौक, इर्विन चौक मार्गे पुन्हा विमलाबाई देशमुख सभागृहात संपन्न होणार आहे. इर्विन चौकात पथनाट्य व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी माय भारत पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.'मेरा युवा भारत' आणि केंद्रीय युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या वतीने आयोजित या पदयात्रेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली.

यावेळी युवा अधिकारी स्नेहल बासुतकर, क्रीडा अधिकारी गणेश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना आणि एनसीसीचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी पोलिस, आरोग्य व महापालिकेला आवश्यक सुविधा पुरविण्याच्या सूचना दिल्या. पदयात्रेदरम्यान आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याचेही निर्देश त्यांनी दिले.

# कष्टाचं सोनं मातीमोल!

### तुटपुंजा भावामूळे केळ रस्त्यावर

महासागर प्रतिनिधी

**पथ्रोट, ( दि.11 )–** परतवाडा ते अंजनगाव, अकोट ते तेल्हारा आणि जळगाव जामोद मार्गावर सध्या शेतकऱ्यांची व्यथा रस्त्यावर दिसत आहे. केळीला मिळणारा तुटपुंजा भाव आणि बाजारातील मंदीमुळे केळी उत्पादकांची आर्थिक कोंडी झाली आहे. काही महिन्यांपूर्वी 2200 रुपयांचा भाव असलेले दर आता थेट 400 रुपयांवर कोसळले असून, शेतकऱ्यांना रस्त्यावर थेट विक्रीचा मार्ग स्वीकारावा लागत आहे.



#### दर घसरले, शेतकरी रस्त्यावर!

जून महिन्यात केळीला 2 हजार 200 ते 2 हजार 500 रुपये प्रति क्विंटल दर मिळत होता. मात्र, सध्या तो 400 ते 600 रुपयांवर आला आहे. काही ठिकाणी तर एक घड केवळ 10 रुपयांत विकला जात आहे. दिवसभर विक्रीस बसूनही दिवसाचा खर्चही भरून येत नाही. कष्टाचं सोनं मातीमोल होतंय, अशी शेतकऱ्यांची भावना व्यक्त होत आहे.

#### पिकाची नासाडी आणि व्यापाऱ्यांची पिळवणूक

अचलपूर, अंजनगाव व अकोट तालुक्यातील हजारो एकरांवरील केळी शेती संकटात सापडली आहे. बाजारपेठेत मागणी नसल्याने शेतातच केळी सडत आहे. शहरात डझनला 30–40 रुपये दराने विकली जाणारी केळी व्यापारी शेतकऱ्यांकडून अतिशय कमी भावात खरेदी करतात. आम्ही तयार केलेलं उत्पादन महाग विकलं जातं, पण आमच्याकडे मात्र कवडीमोल दर मिळतो, अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

#### खाडी देशांच्या आयातीचा फटका

भारताच्या केळी निर्यातीपैकी सुमारे 70 टक्के हिस्सा खाडी देशांकडे जातो. पण अलीकडे या देशांनी पाकिस्तानी केळीची आयात सुरू केल्याने भारतीय केळीच्या मागणीत घट झाली आहे. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेतील दर घसरले आणि शेतकऱ्यांचा आर्थिक तोल बिघडला.

#### मदतीची अपेक्षा

1500 रोपांवर लागवड केली, पण दर घसरल्याने सर्व श्रम वाया गेले, अशी व्यथा पांढरी खानमपूर येथील विश्वनाथ दाभाडे यांनी व्यक्त केली. शेतकरी संघटनांकडून केळी उत्पादकांना हमीभाव, आर्थिक मदत आणि दर स्थिरीकरणासाठी शासनाने तत्काळ पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.

# जरूड हायस्कूलमध्ये 'माजी विद्यार्थी संघ'स्थापन

महासागर | प्रतिनिधी



**वरुड,( दि.11 ) –** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित जरूड हायस्कूल आणि पी. जी. राऊत कनिष्ठ महाविद्यालय, जरूड येथे शासनाच्या निर्देशानुसार 'माजी विद्यार्थी संघ' स्थापन करण्यात आला. ही सभा शेषराव खाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

संघाच्या कार्यकारिणीत अध्यक्ष शेषराव खाडे, उपाध्यक्ष उल्हास तडस, सचिव ओमप्रकाश दुपारे, कोषाध्यक्ष गजानन देशमुख यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून मधुकर धोटे, सुरेश नागले, सी. टी. पठाण, प्रमोद जावळे, राजेंद्र फूसे, अनिल देशमुख, रोषण दारोकर, संजय वाघमारे, रुपेश कानडे, सुनिल सोळंके यांचा समावेश आहे. सल्लागार म्हणून प्रीयदर्शन देशमुख, नंदकुमार धारगे, सुधाकर मानकर, अवि देशमुख, रामचंद्र पाटील, विजय ढोमणे, राजेंद्र कुऱ्हाडे आणि प्रसिद्धी प्रमुख प्रशांत काळबेंडे यांची निवड झाली.

शेषराव खाडे यांनी लवकरच भव्य माजी विद्यार्थी मेळावा घेण्याचा मानस व्यक्त केला. अनेक माजी विद्यार्थी हे अधिकारी, प्राध्यापक, अभियंते, शिक्षक, व्यावसायिक आणि प्रगतिशील शेतकरी म्हणून विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. जेष्ठ सल्लागार प्रीयदर्शन देशमुख यांनी शालेय मित्रांची भेट होणार असल्याने आनंद व्यक्त केला. सभेचे संचालन प्रा. सुनिल सोळंके यांनी केले, तर मुख्याध्यापक ओमप्रकाश दुपारे यांनी आभार मानले.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# अस्मिता

## थंडगार गुलाब फिरनी

**रसगंधा**



घरी गोडाधोडाचा पदार्थ करायचा असेल तर श्रीखंड, गुलाबजाम, रबडी, जिलेबी, रसमलाई असे मोजके पर्याय समोर येतात. रूचीपालट म्हणून तुम्ही गुलाबाची फिरनी बनवून बघा.

**साहित्य:** दोन लीटर दूध, अर्धा कप तांदूळ, दीड कप कंडेन्स्ड मिल्क, गुलाबाची पानं, दोन चमचे गुलकंद, तीन ते चार चमचे साखर, दोन चमचे गुलाबपाणी किंवा रूह अफ्जा, अर्धा चमचा वेलची पूड, पिस्ता, बदाम आणि काजू, गुलाबाची वाळलेली पानं.

**कृती:** तांदूळ धुवून अर्धा तास भिजवून ठेवा. मग तांदूळ वाळू वाटून घ्या. हे वाटलेले तांदूळ पुन्हा पाण्यात भिजवून ठेवा. एका पातेल्यात दूध उकळायला ठेवा. उकळी आल्यावर गॅस कमी करा. दुधात वाटलेले तांदूळ घाला. दूध थोडं आटू द्या. मधल्या काळात तांदूळही शिजतील. तांदूळ मऊ शिजल्यानंतर साखर घाला. मग काजू, बदाम आणि पिस्त्याचे काप आणि वेलची पूड घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. साधारण पाच मिनिटांनी गॅस बंद करा. फिरनी थंड होऊ द्या. गुलाबाच्या वाळलेल्या पानांनी सजावट करा. थंडगार गुलाब फिरनी खा.

**स्कीन केअर**

### कमी करा त्वचेचा सैलसरपणा

वाढत्या वयाच्या खुणा त्वचेवर दिसू लागतात. सुरकुत्या पडणं, फाईन लाईन्ससह त्वचा सैल पडणं ही प्रमुख समस्या असते. तुमचीही त्वचा सैल पडली असेल तर काही उपायांनी ही समस्या दूर करता येईल. त्वचेचा सैलसरपणा कमी करण्यासाठी खोबरेल तेल वापरता येईल.



खोबरेल तेलाने चेहऱ्याला मसाज करा. मसाजमुळे रक्ताभिसरण सुधारतं. यातल्या 'ई' जीवनसत्त्वामुळे त्वचेच्या पेशी पुनरुज्जीवित होतात. ग्रीन टीमुळेही त्वचेचा सैलसरपणा कमी होतो. अंड्याचा पांढरा भाग आणि मध यांचं मिश्रण चेहऱ्याला लावता येईल.

**मेक अप**

### झटपट मेक अप करा

सकाळच्या धावपळीत मेक अप करायला वेळ मिळत नाही. बरेचदा ऑफिसमधून एखाद्या समारंभाला जावं लागतं. अशा वेळी झटपट मेक अप करण्याच्या काही टिप्स उपयोगी पडतील. छोटी हँडबॅग जवळ बाळगा. यात



लिपस्टिक, मस्कारा, बीबी क्रीम, आयलायनर अशी छोट्या आकाराची मेक अप उत्पादनं ठेवता येतील. या उत्पादनांच्या सहाय्याने तुम्ही ऑफिसमध्ये मेक अप करू शकता. नेहमी ड्राय शँपू जवळ बाळगा. केस चमकदार दिसण्यासाठी हा शँपू कधीही वापरता येईल. मेक अपची योजना आदल्या दिवशीच आखा. रात्री केसांना फार तेल लावू नका. तसंच न्यूड मेक अप किंवा कमीत कमी मेक अप करण्याचा पर्याय निवडा.

**स्मार्ट शॉपिंग**



### खरेदी कॉस्मेटिक्सची

मैत्रिणींनो, बाजारात बनावट कॉस्मेटिक्सही मिळतात. या कॉस्मेटिक्समुळे आपले केस, त्वचा यांचं नुकसान होऊ शकतं. हे नुकसान टाळण्यासाठी खरेदी काळजीपूर्वक करायला हवी. कॉस्मेटिक्सच्या खरेदीसाठी दुकानं वारंवार बदलू नका. चांगल्या आणि नावाजलेल्या दुकानातूनच खरेदी करा. ब्रँड्च्या लेबलकडे लक्ष द्या. तसंच पॅकेजिंगकडेही लक्ष ठेवा. तुमचा नेहमीचा ब्रँड विकत घ्या. नव्या ब्रँडची कॉस्मेटिक्स शक्यतो टाळा.

**किचन टिप्स**

### विरजण नसेल तर...

उन्हाळ्यात दही, ताक लागतं. तुम्ही घरीच दही लावू शकता. दही लावण्यासाठी घरात विरजण नसेल तर सुक्या लाल मिरच्यांचा वापर करता येईल. आश्चर्य वाटलं तरी हे खरं आहे. दही लावण्यासाठी दूध उकळून घ्या. दूध थंड झाल्यावर त्यात दोन ते तीन सुक्या लाल मिरच्या घाला. हे दूध रात्रभर तसंच ठेवा. सकाळी दही लागलेलं असेल. हे दही फार घट्ट नसलं तरी चांगलं लागतं.





**८२ ओई ब्रँडतर्फे साधी, परिणामकारक आणि रोजच्या दिनचर्येत वापरता येईल अशी भारतीय स्किनकेअर उत्पादने बनवली आणि विकली जातात. ही उत्पादने क्लिनिकली टेस्टेड, डरमॅटोलॉजिकली सेफ आणि क्रुएल्टी-फ्री असल्याचा दावा केला जातो. भारतीय त्वचेला अनुरूप असे नैसर्गिक घटक त्यांच्या फॉर्म्युलामध्ये वापरले जातात. अश्वगंधा, हळदीचे अर्क, गुलाब, कोकम, नारळ, चहा यांसारख्या वनस्पतींचे अर्क वापरून ही स्कीनकेअर्स बनवली जातात.**

## दीपिकाचा कॉस्मॅटिक ब्रँड

दीपिका पदुकोन एक यशस्वी अभिनेत्री म्हणून सगळ्यांनाच माहिती आहे. पण ती एक यशस्वी उद्योजिका आहे, ही गोष्ट मात्र फारशी कुणाला माहिती नाही.

२०२२ मध्ये दीपिका पदुकोनने '८२ डिग्रीज ई' म्हणजेच '८२ डिग्रीज ईस्ट' हा स्वतःचा स्किनकेअर ब्रँड सुरू केला. या ब्रँडचे नाव भारताच्या देशांतर रेषेवरून घेतले आहे. देशांतर रेषा म्हणजे ज्यावर भारतीय घड्याळाची वेळ म्हणजे इंडियन स्टँडर्ड टाइम ठरवला जातो, ती भारताच्या मध्यभागातून जाणारी काल्पनिक रेषा. म्हणजेच भारतीयत्व आणि आधुनिकता या दोन्हीचे मिश्रण करून तिने हे नाव निवडले आहे. जूही चतुर्वेदीया ब्रँडची सहसंस्थापक आहे. अनुभवी बिझनेस एक्झिक्युटिव्ह जितेंद्र कुमार यांचाही यात सहभाग आहे.

'८२ डिग्रीज ई' ब्रँडतर्फे साधी, परिणामकारक आणि रोजच्या दिनचर्येत वापरता येईल अशी भारतीय स्किनकेअर उत्पादने बनवली आणि विकली जातात. ही उत्पादने क्लिनिकली टेस्टेड, डरमॅटोलॉजिकली सेफ आणि क्रुएल्टी-फ्री असल्याचा दावा केला जातो. भारतीय त्वचेला अनुरूप असे नैसर्गिक घटक त्यांच्या फॉर्म्युलामध्ये वापरले जातात. अश्वगंधा, हळदीचे अर्क, गुलाब, कोकम, नारळ, चहा यांसारख्या वनस्पतींचे अर्क वापरून ही स्कीनकेअर्स बनवली जातात.

अश्वगंधा बाऊन्स हे मॉईश्चरायझर आणि पॅचौली ग्लो हे सनस्क्रीन ड्रॉप्स या ब्रँडने सुरुवातीला बाजारात आणले. त्यानंतर फेस ऑइल, क्लेन्सर, नाईट रिपेअर ट्रीटमेंट, अँटीपोल्युशन सीरम अशी काही नवीन प्रॉडक्ट्स त्याला जोडली गेली. प्रत्येक उत्पादनाच्या पॅकेजिंगमध्ये मिनिमल डिझाइन आणि पर्यावरणपूरक साहित्याचा वापर केला जातो.

८२ ओए हा भारतातला पहिला असा सेलिब्रिटी ब्यूटी ब्रँड नाही, पण दीपिका पदुकोनच्या प्रतिमेमुळे तो सुरुवातीलाच चर्चेत आला. सोशल मीडियावर भारतीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याची जाहिरात केली जाते. हा ब्रँडची विक्री मुख्यतः ऑनलाइन केली जाते. ही उत्पादने स्वतःच्या वेबसाइटद्वारे आणि काही निवडक ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत.

दीपिका पदुकोन म्हणते, झटपट ट्रेंडी उत्पादनांपेक्षा 'क्वालिटी आणि सिंप्लिसिटी' या तत्त्वांवर मी भर दिला आहे. ८२ ओए हा भारतीय सौंदर्य संकल्पना आणि आधुनिक विज्ञान यांचा संगम म्हणून ओळखला जात आहे.



## प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी...

**डाएट अँड न्यूट्रिशन**

सध्या कोरोना विषाणूच्या प्रकोपामुळे संपूर्ण जग धास्तावलं आहे. या विषाणूवर सध्या तरी कोणताही उपचार नाही. त्यामुळे कोरोनाला दूर ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यायला हवा. आपण आपल्यासह कुटुंबाला आणि समाजालाही सुरक्षित ठेवायला हवं. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपण रोगप्रतिकारक शक्ती वाढवू शकतो. यासाठी काही पदार्थांचं सेवन करता येईल. रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या काही घटकांविषयी...



- आहारात आलं आणि लसणाचा समावेश करा. या दोन्ही घटकांमध्ये विषाणूंचा नाश करण्याची क्षमता आहे. तुम्ही आलं घातलेला चहा पिऊ शकता. तसंच विविध पदार्थांमध्ये आलं-लसणाची पेस्ट घालू शकता. आल्याचे तुकडेही चघळता येतील.
- चक्रफूल या मसाल्याच्या पदार्थात शिकिमिक आम्ल असतं. फ्लूविरोधी टॅमी फ्लू गोळ्यांच्या निर्मितीत या आम्लाचा वापर होतो. चक्रफूलाची पूड करून विविध पदार्थांमध्ये घालता येईल. पुलाव, भाज्यांमध्येही चक्रफूल घालता येईल.
- ओरिगॅनो, तुळस, हळद या घटकांमध्येही रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे गुण आहेत. सर्दी, खोकला, तापावर उपाय म्हणून तुळशीची पानं चघळता येतील. हळदीचं दूधही पिता येईल.
- खोबरेल तेलामुळेही रोगप्रतिकारक शक्ती वाढते. या तेलात लॉरिक आणि कॅप्रिलिक आम्लं असतात.
- शेंगदाणे, पिस्ते, द्राक्ष, ब्लूबेरी, क्रॅनबेरी, स्ट्रॉबेरी, कोका, डार्क चॉकलेट यामध्ये रेव्हेट्रोल नामक घटक असतो. या घटकामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. जंतुसंसर्ग, अल्ट्राव्हायोलेट किरणोत्सर्ग, ताण, जखमा बऱ्या करण्यात हा घटक महत्त्वाची भूमिका बजावतो.
- अँटी ऑक्सिडंट्युक्त 'क' जीवनसत्त्व रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यात खूप प्रभावी आहे. 'क' जीवनसत्त्वामुळे शरीराच्या पेशींचं कार्य सुधारतं. 'क' जीवनसत्त्वाचा कमतरतेमुळे जंतुसंसर्गाचा धोका वाढतो. आवळा, लिंबू, संत्री, मोसंबी, स्ट्रॉबेरी, लाल सिमला मिरची यांचा आहारात समावेश करा.
- भाज्या शिजवून खा. फळं आणि भाज्या स्वच्छ धुवा. उपवास करू नका. फक्त फळांच्या रसावर राहू नका. भाज्या शिजवण्याआधी अर्धा तास मीठ आणि हळद घातलेल्या पाण्यात भिजवून ठेवा.

## डिजिटल शॉर्टकट्स

**टेक्नो टिप्स**

आपल्या दैनंदिन डिजिटल जीवनात वेळेचे व्यवस्थापन खूप महत्त्वाचे आहे. आपण मोबाईल, लॅपटॉप किंवा टॅबवर तासन् तास काम करतो. पण अनेकदा छोटी छोटी कामे करण्यात जास्त वेळ जातो. त्यासाठी शॉर्टकट्सची मदत होते. शॉर्टकट्स म्हणजे कीबोर्डवरील किंवा मोबाईलवरील झटपट कमांड्स. त्यांचा वापर केल्यामुळे वेळ वाचतो आणि काम वेगाने होते.

कॉम्प्युटर वापरताना आपण रोजच कॉपी, पेस्ट, सेव्ह, प्रिंट अशी कामे करतो. त्यासाठी माऊसऐवजी कीबोर्ड शॉर्टकट्स वापरले तर तीच कामे सेकंदात होतात. उदाहरणार्थ, कंट्रोल+सी म्हणजे कॉपी, कंट्रोल+व्ही म्हणजे पेस्ट, कंट्रोल+एस म्हणजे सेव्ह. हे शॉर्टकट्स इतके सोपे आहेत की चटकन लक्षात राहतात. त्याचा फायदाही खूप होतो. जसे ई-मेल लिहिताना कंट्रोल+एंटर वापरून लगेच



मेल पाठवता येतो किंवा वर्डमध्ये कंट्रोल + बी करून टेक्स्ट बोल्ड तर कंट्रोल + आय वापरून इटेलिक्समध्ये म्हणजे तिरपे करता येते.

आजकाल मोबाईलमध्येही बरीच शॉर्टकट्स फीचर्स आहेत. उदाहरणार्थ, होम स्क्रीनवर विगेट्स लावून हवामान, कॅलेंडर, टू-डू लिस्ट किंवा हेल्थ डेटा लगेच दिसतो. बऱ्याच ॲप्समध्ये आयकॉनवर जास्त वेळ बोट ठेवलं की थेट हवे ते काम सुरू होते. समजा, कॅमेऱ्यावर बोट ठेवले की थेट 'सेल्फी मोड' उघडतो. या शॉर्टकट्समुळे काम लवकर होते आणि आपण दुसऱ्या कामासाठी वेळ देऊ शकतो.

आजचा काळ स्मार्ट वर्कचा आहे. स्मार्ट वर्कची सुरुवात अशा शॉर्टकट्सपासूनच होते. त्यामुळे तुमच्या संगणकात आणि मोबाईलमध्ये कोणते शॉर्टकट्स आहेत हे शोधा. वापरा आणि वेळ वाचवा.




## असा लावा पुदिना

**परसबाग**

पुदिन्याची चटणी छान लागते. पुदिन्यामुळे तोंडाची दुर्गंधी दूर होते. चटणी बनवण्यासाठी बाजारातून पुदिना आणण्याऐवजी घरीच लागवड करता येईल.

- पुदिन्याची लागवड करण्यासाठी बाजारातून जाड देठ असणारा पुदिना विकत घ्या. पुदिन्याची पानं वापरून टाका आणि देठ जपून ठेवा. कुंडी, कंटेनरमध्ये पुदिन्याची लागवड करता येईल. पुदिन्याच्या लागवडीसाठी कसदार, पोषणमूल्य असणारी माती लागते.
- पुदिन्याची लागवड करण्याआधी माती ओली करून घ्या. यानंतर पुदिन्याचे देठ पेरा. दोन देठांमध्ये बऱ्यापैकी अंतर ठेवा. देठ पेरल्यानंतर थोडं पाणी शिंपडा. पाण्याचा निचरा होण्यासाठी कुंडी किंवा कंटेनरला खालच्या बाजूने छिद्र पाडा. पुदिन्याला फार पाणी घालू नका. माती ओलसर राहील याची काळजी घ्या.



- संध्याकाळी किंवा रात्री पुदिन्याची लागवड करणं योग्य ठरतं. पुदिन्याला सकाळचा सूर्यप्रकाश मिळायला हवा. तसंच दुपारच्या वेळी कुंडी सावलीत ठेवा. काही दिवसांनंतर देठांना पानं फुटू लागतील. साधारण दहा ते पंधरा दिवसांच्या अंतराने गांडूळखत घालत रहा.
- पुदिन्याची पानं भरभर वाढतात आणि पसरतात. त्यामुळे तुमची कुंडी बऱ्यापैकी रुंद असायला हवी.
- पूर्ण वाढ झाल्यानंतर पुदिन्याची पानं वापरता येतील.

## कलर युवर हेअर

**ब्यूटी टॉक**

रंगवलेले केस खूप छान दिसतात. पण काही महिलांना केस तात्पुरते रंगवायचे असतात. अशा वेळी पार्लरमध्ये जाऊन वेळ आणि पैसे वाया घालवण्यापेक्षा वेगवेगळ्या पद्धतींनी घरीच केस रंगवता येतील. केस रंगवण्याच्या सोप्या पद्धतींविषयी...



- केस तात्पुरत्या स्वरुपात रंगवण्याचा सहज, सोपा आणि स्वस्त उपाय म्हणजे हेअर चॉक. केस हायलाईट करायचे असतील किंवा कमी दिवसांसाठी वेगळा रंग हवा असेल तर तुम्ही हेअर चॉक वापरू शकता. केस थोडेसे ओले करून हा चॉक वापरायचा असतो. वेगवेगळ्या रंगांचे हेअर चॉक मिळतात. केस आठ ते दहा वेळा धुतल्यानंतरही हा रंग टिकतो. त्यानंतर मात्र रंग उतरू लागतो. त्यामुळे हेअर चॉक अगदी आरामात वापरता येईल.
- हेअर कलर स्प्रे हा सुद्धा चांगला पर्याय आहे. या स्प्रेचा वापर करून अगदी सोप्या पद्धतीने केस रंगवता येतात. केसांच्या मुळांपासून शेंड्यांपर्यंत स्प्रे करता येतो. लग्न किंवा एखाद्या समारंभासाठी केस रंगवायचे असतील तर हेअर स्प्रे वापरता येईल.
- केस कायमस्वरूपी रंगवल्यानंतर तुमचा लूक कसा दिसेल हे जाणून घ्यायचं असेल तर सेमी परमनंट हेअर डाय वापरा. यामुळे तुम्हाला परफेक्ट लूक मिळेल. हा रंग अधिक काळ टिकतो. तसंच याचे फारसे दुष्परिणामही नाहीत.
- घातक रसायनांपासून केसांचं रक्षण करायचं असेल तर तुम्ही व्हेजिटेबल डाय वापरू शकता. हा डाय बराच काळ टिकून राहतो. या डायमुळे केसांचं नुकसान होत नाही. तसंच केस छान चमकदार दिसतात.
- हेअर कलर वॅक्स हा सुद्धा खूप चांगला पर्याय आहे. हा वॅक्स हातांवर घेऊन केसांवर लावायचा असतो. यामुळे खूप छान लूक मिळतो. यात विविध रंग उपलब्ध आहेत.

## या साड्या हव्याच...

**फॅशन फंडा**

मैत्रिणींनो, साडी कधीही आउट ऑफ फॅशन होत नाही. काही खास प्रसंगी साड्या नेसणं योग्य ठरतं. साडीमध्ये स्त्रीचं सौंदर्य खुलतं असं उगाच म्हटलं जात नाही. अत्यंत सुंदर आणि आकर्षक साड्या आपल्याला भुलवतात. साड्यांचे असंख्य प्रकार आहेत. पण तुमच्या वॉर्डरोबमध्ये ठराविक प्रकारच्या साड्या असायला हव्यात.

- कॉटन साडी मस्ट हॅव आहे. कॉटनच्या साडीसोबत कॉन्ट्रास्ट प्रिंटेड ब्लाउज घालता येईल. कॉटनची साडी खूपच आरामदायी आहे. तसंच ही साडी खूपच सुंदर दिसते. कॉटन साडी व्हर्सटाईलही आहे. कॉटनच्या साडीवर सिल्व्हर ज्वेलरी घालता येईल.
- तुमच्याकडे एखादी पारंपरिक सिल्क साडी असायला हवी. कांचीपुरम, बनारसी, चंदेरी यापैकी कोणत्याही साडीची निवड तुम्ही करू शकता. सिल्क साडीमुळे तुम्हाला रॉयल लूक मिळेल. खास समारंभात सिल्कची साडी शोभून दिसते.



- उन्हाळ्यात प्रिंटेड साडी शोभून दिसेल. जॉर्जेट किंवा शिफॉन मटेरियलची प्रिंटेड साडी घ्या. या प्रिंटेड साड्या दररोज कॅरी करता येतील. वजनाला हलक्या असणाऱ्या या साड्या दिसतातही खूप छान.
- बॉलिवूड सेलेब्ज पेस्टल साडी कॅरी करताना दिसतात. या साडीवर मोत्यांची माळ किंवा दागिने शोभून दिसतात. संध्याकाळच्या पार्टीला या साड्या शोभून दिसतात. त्यामुळे तुम्हीही एखादी पेस्टल साडी विकत घ्या.
- सध्या सीक्वेन्स वर्क वाल्या साड्यांचा ट्रेंड आहे. सीक्वेन्स साड्या वजनाला हलक्या असतात. या साड्या खूप सुंदर दिसतात. एखाद्या स्टायलिश ब्लाउजसह ही साडी कॅरी करा.
- थोडं ट्रेंडी दिसायचं असेल तर लेहंगा साडी कॅरी करा. ही साडी खूप आकर्षक दिसते. या साडीवर स्टेटमेंट ज्वेलरी छान दिसेल.
- साडी गाऊनही बराच लोकप्रिय ठरतो आहे. इंडो-वेस्टर्न लूकसाठी तुम्ही ही साडी नेसू शकता. झटपट तयार व्हायचं असेल तर साडी गाऊन मस्ट आहे.

## आर्थिक साक्षरता

**स्किल डेव्हलपमेंट**



आर्थिक साक्षरता म्हणजे पैशांचे नियोजन, बचत, गुंतवणूक आणि खर्च याबद्दल योग्य माहिती आणि समज. जेव्हा एखाद्या व्यक्तीला पैसे कसे हाताळायचे, कुठे खर्च करायचे आणि भविष्यासाठी काय राखून ठेवायचे हे कळते, तेव्हा ती अधिक जबाबदार आणि निर्णयक्षम बनते. यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि स्वतःच्या विकासात पैसे योग्य ठिकाणी वापरता येतात.आर्थिक शिस्त असल्यावर आपण अनावश्यक खर्च कमी करून त्या पैशाचा उपयोग योग्य त्या गुंतवणुकीसाठी करू शकतो.

आर्थिक ज्ञान आणि माहिती व्यक्तीला भविष्यातील संधी आणि जोखमी समजून घेण्याची क्षमता देते. विमा, बचत योजना, छोटे-मोठे गुंतवणूक पर्याय, सरकारी योजना किंवा स्वतःचा लहान व्यवसाय सुरू करण्याच्या शक्यता याची माहिती असली की स्त्रिया आणि तरुण स्वतःसाठी अधिक पर्याय तयार करू शकतात. आर्थिक समज असली तर कर्ज, ईएमआय याविषयी निर्णय घेता येतात. फसवणूक आणि लबाडीचे प्रकार टाळणे शक्य होते.

आर्थिक साक्षरता असेल तर घर सांभाळणाऱ्या महिला आत्मविश्वासाने घराचा खर्च, बचत आणि मुलांच्या शिक्षणासाठीची योजना हे निर्णय स्वतः घेऊशकतात. त्या अधिक आत्मनिर्भर होतात. पैशाची किंमत, खर्चाचं प्राधान्य, आपत्कालीन निधी आणि लहान गुंतवणूक यामुळे त्यांची निर्णयक्षमताही वाढते. त्यामुळे आर्थिक साक्षरता आजच्या काळात उत्तम व्यक्तिमत्त्व घडवण्याचा एक मार्ग आहे.

# नागपूर मनपाची आरक्षण सोडत जाहीर

## अनु. जाती महिलांसाठी १५, अनु. जमातीसाठी ६ व मागास प्रवर्गातील महिलांसाठी २० जागा : सर्वसाधारण प्रभागातील ३५ राखीव

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
नागपूर महानगरपालिकेच्या होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) तसेच सर्वसाधारण महिला या वर्गासाठी आरक्षण निश्चित करण्याची सोडत आज मंगळवारी काढण्यात आली. महानगरपालिकेतील ३८ प्रभागातील विविध प्रवर्गातील एकूण १५१ जागापैकी ७६ जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.

नागपूर महानगरपालिकेत एकूण १५१ जागापैकी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ३० जागा राखीव आहेत. त्यापैकी १५ जागा महिलांसाठी राखीव झाल्या. अनुसूचित जमातीसाठी एकूण १२ जागा राखीव आहेत. त्यापैकी ६ जागा महिलांना राखीव झाल्या. नागरिकांचा मागास प्रवगार्साठी एकूण ४० जागा राखीव आहेत. त्यापैकी २० जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. उर्वरित ६९ सर्वसाधारण मतदारसंघातील जागापैकी ३५ जागा महिलांसाठी राखीव करण्यात आलेल्या आहेत.



कविवर्य सुरेश भट सभागृहात मंगळवारी सकाळी आरक्षण सोडतीला सुरूवात झाली. यावेळी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी., उपायुक्त मिलिंद मेश्राम, सहाय्यक आयुक्त श्याम कापसे, सहाय्यक आयुक्त नरेंद्र बावनकर, सहाय्यक आयुक्त राजकुमार मेश्राम, कार्यकारी अभियंता सुनील उईके, रितेश लोखंडे, अनंता नागमोते, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, निवडूक विभागाचे अरुण जोगे, पुरुषोत्तम पांडे, प्रशांत सपाटे, सांतोस मोगीलवार, दिलीप देवगडे, सुमित मुटकूरे, रवींद्र बंड, आशुतोष पानतावणे, कमलेश झंझाळ, जितेंद्र धकाते यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार आरक्षण सोडत काढण्यात आली. मनपाचे उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी आरक्षण सोडतीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून दिली. आरक्षण सोडत पारदर्शक पद्धतीने काढण्यात आली. आरक्षित असलेल्या प्रभागांची नावे उपस्थितांना दाखविण्यात आली व ते एका पारदर्शक काचेच्या पेटीत टाकण्यात आली. मनपाच्या नेताजी शाळेंच्या मुलांच्या हातांनी सोडत काढण्यात आल्या.

**पारदर्शक सोडत - आयुक्त डॉ. चौधरी**

नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निदेर्शांचे पालन करून पारदर्शक पद्धतीने आरक्षणाची सोडतीची प्रक्रिया पूर्ण केली आहे, या सोडतीच्या प्रारुपाला राज्य निवडणूक आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर अधिकृतपणे जाहीर करण्यात येईल. आरक्षणाचे प्रारुप महानगरपालिकेच्या कार्यालयात तसेच संकेत स्थळावर सुद्धा उपलब्ध करून दिल्या जाईल, असे महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले.

**१७ ला आरक्षणाचे प्रारुप प्रसिद्ध**

मंगळवारी झालेल्या सोडतीनंतर आरक्षण सोडतीचे प्रारुप येत्या १७ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे. या प्रारुपावर हरकत किंवा सूचना करण्यासाठी येत्या २४ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत मुदत दिली आहे.

## पंतप्रधान मोदींच्या आश्वासनांची दिल्ली हल्ल्यामुळे पोलखोल

### पटोलेंची टीका



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ११ :**
काँग्रेसचे नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्ली येथे झालेल्या घटनेनंतर केंद्र सरकारवर सडकून टीका केली आहे.

नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलताना पटोले म्हणाले की, आम्हीच करू शकतो अश्या पद्धतीने आश्वासन देऊन लोकांना मूर्ख बनवले. आता कश्मीर असुरक्षित आहे, ५६ इंचाची छाती आता कुठे गेली आहे. आम्हाला राजकारण करायचे नाही. दिल्लीत आणि केंद्रात यांचे सरकार असताना हे आतंकवादी या ठिकाणी आले कुठून असा प्रश्न निर्माण होत आहे. नरेंद्र मोदींनी दिलेल्या खोटे आश्वासनाची पोलखोल आता झाली आहे.

पुलवामा, पहेलगाम हल्ला झाला तेव्हा सरकारच्या सोबत होतो. मात्र पहेलगाम, पुलवामाच्या घटनेनंतर राजकारण केलं नाही. मात्र सरकार त्यानंतर हे काही करू शकले नाही आतंकवादाला पकडू शकले नाही. हे केंद्र सरकारचे अपयश आहे. त्याची जबाबदारी केंद्र सरकारने स्वीकारावी. निवडणुका लढणे आणि पक्ष जिंकवणे अशा पद्धतीची भाजपची भूमिका असते. देश हित आणि सुरक्षेबद्दल त्यांच्याजवळ कुठलीही योजना नाही, हे गुप्तचर यंत्रणेचे सपशेल अपयश आहे, अशा शब्दात पटोले यांनी टीका केली.

## कडाक्याची थंडी, विदर्भ गारठला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
वातावरणात अचानक मोठा बदल झाला असून, दोन दिवसांपासून पडलेल्या कडाक्याच्या थंडीने विदर्भ गारठला असूप, तापमान २० अंश सेल्सीअसपर्यंत आले आहे.

## एअर इंडिया एक्स्प्रेसची नवीन उड्डाणे
## नागपूर-बेंगळुरू दरम्यान दिवसातून दोन फ्लाइट्स

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ११ :**
एअर इंडिया एक्स्प्रेसने आपल्या वाढत्या नेटवर्कमध्ये आता नागपूरचा समावेश करत असल्याची घोषणा केली असून, १ डिसेंबर पासून नागपूर-बेंगळुरू दरम्यान दिवसातून दोन उड्डाणे सुरू करणार आहे. या एअरलाइन्सने गेल्या दोन महिन्यांत पाच नवीन केंद्रांची भर घातली आहे.



सध्या एअरलाइन मुंबईतून आठवड्याला १३० पेक्षा अधिक आणि पुणेतून ९० पेक्षा अधिक उड्डाणे चालवते. लवकरच एअर इंडिया एक्स्प्रेस नवी मुंबई विमानतळावरूनही सेवा सुरू करणार असून, येथून आठवड्याला ३५ उड्डाणे बेंगळुरू, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद आणि कोलकाता या प्रमुख शहरांकडे जाणार आहेत.

## समृद्धीवरील अपघातात नागपूरचा प्रवासी ठार

■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. ११ :**
समृद्धी महामार्गावर भरधाव कार समोर जाणाऱ्या ट्रकवर आदळल्याने झालेल्या अपघातात जण जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी झाला. चेनेल क्रमांक २९८.०१ येथे नागपूरच्या दिशेने जाणारी स्कार्पिओ कार समोर जाणाऱ्या ट्रकला मागून धडकली. या अपघातात नावेद शामिया अब्बास (वय ४५, रा. नागपूर) यांचा जागीच मृत्यू झाला, तर कार चालक बिलाल जफर अब्बास (वय ३८, रा. नागपूर) हा गंभीर जखमी झाला आहे.

घटनास्थळी महामार्ग पोलीस उपकेंद्र फरदापुरचे पोलीस उप निरीक्षक जितेंद्र राऊत, पोलीस हवालदार, जमादार हे तात्काळ दाखल झाले. त्यांनी मृत आणि जखमींना रुग्णालयात हलविले.

























